भाग १



BVBK-0403195

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
क्र. ३७९५ ७१११९६
मुलांसाठी
बा.वा.
वाचनाल
बा.वा.
३७९५
७१११९६

# अरेबियन नाइटस्

भाग १ ला

सौ. रेचल गडकर

BVBK-0403195

किंमत १२ रुपये

जय हिंद प्रकाशन, मुंबई २

# दोन शब्द

'अरेबियन नाईटस्' या मूळच्या अरबी भाषेतील मनोरंजक, अद्‌भुतरम्य, चटकदार आणि बोधप्रत कथा असून त्यांची अनेक भाषांतून भाषांतरे झाली आहेत. मराठी भाषेतही या कथांचे कै. कृष्णशास्त्री चिपळूणकर व इतर थोर विद्वानांनी भाषांतरे केली आहेत. त्यांतील काही कथा मुलांचेही मनोरंजन करू शकतील अशा आहेत. त्यांची निवड करून त्या कथांतील क्लिष्टता व मुलांना सांगण्यास योग्य नसलेला भाग काढून टाकून मुलांना त्या वाचावायास आवडतील अशा पद्धतीने लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. या कथांमुळे मुलांचे मनोरंजन तर होईलच परंतु त्या मुलांसाठी उद्बोधकही ठरतील अशी आशा आहे.

तेव्हा बालमित्रांनो, तुम्ही या कथांचा भरपूर आस्वाद घ्या. स्वत: वाचा. मित्रांना वाचायला सांगा आणि या कथा दुसऱ्यालाही कथन करा. मात्र लेखिकेला या पुस्तकाविषयीचा अभिप्राय पाठवावयास विसरू नका बरं का!

आपली

सौ. रेचल गडकर

३०६, वर्षा, जुना सोलापूर रोड,

कळवा पोस्ट ऑफीस जवळ,

पो.- कळवा (पश्चिम), जि.- ठाणे

पिन : ४००६०५

१

# असंख्य स्त्रियांचे प्राण वाचविणारी चतुर शाहजादी

फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट. पारस नावाच्या एका दूरच्या देशात एक बलाढ्य बादशहा होऊन गेला. मात्र त्याचे दोन मुलगे शाहरियार आणि शाहजेमान अतिशय तापट व लहरी होते. बादशहाच्या मृत्यूनंतर शाहरियार पारस देशाचा राजा झाला. त्याचे आपल्या धाकट्या भावावर प्रेम होते. म्हणून त्याने त्याला तार्तरी देशाचे राज्य देऊन टाकले. तिकडे तो स्वतंत्रपणे राज्य करू लागला. बऱ्याच वर्षांत दोन्ही भावांची भेट नव्हती. अचानक दोन्ही भावांनाही एकमेकांना भेटावे असे वाटू लागले. दोघांनीही एकमेकांची भेट व्हावी अशा आशयाचे खलिते एकमेकांना पाठविले. शेवटी शाहजेमान बादशहाने आपले राज्य आपल्या प्रधानमंडळाच्या हाती थोडे दिवस सोपवून विश्रांतीसाठी शाहरियार बादशहाच्या महालात येऊन राहावे असे ठरले. सर्व व्यवस्था झाल्यानंतर शाहजेमान मोठ्या इतमामाने आपल्या मोठ्या भावाच्या महालात आला. दोन्ही भावांची भेट झाली. शाहरियारने त्याचे उत्तम स्वागत केले.

बरेच दिवस शाहजेमान शाहरियारच्या महालात पाहुणचार घेत होता. महालातून वावरत असताना शाहरियारची बेगम बादशहाला फसवून काही वाईट धंदे करीत असल्याचे शाहजेमान बादशहाच्या लक्षात आले. तिची बादशहा शाहरियार विरुद्ध काही कारस्थानेही चालू होती व त्यापासून या बादशहाच्या

जीवितालाही धोका होता. या कारस्थानापासून आपल्या भावाचे प्राण वाचावे म्हणून त्यानी एक दिवस संधी साधून ही गोष्ट आपला भाऊ बादशहा शाहरियारच्या कानावर घातली. बादशहाने आपल्या सेवकांकडून चौकशी करून सत्य शोधून काढले. खरोखरच आपली बेगम आपल्याविरुद्ध कारस्थान करीत असून आपल्यावर प्रेम असल्याचे नाटक करीत असल्याचे बादशहा शाहरियारच्या लक्षात आले. आपला भाऊ बादशहा शाहजेमान आपल्या देशात परत गेल्यानंतर त्याने आपल्या बेगमला कठोर शिक्षा ठोठावली. तिचा ताबडतोब शिरच्छेद करण्यात आला. एक स्त्री आपली पत्नी बनून आपल्यासारख्या बलाढ्य शक्तिशाली राजाला फसवू शकते याचा त्याला खूपच राग आला. त्याचा सूड त्याने आपल्या देशातल्या सुंदर आणि तरुण मुलींवर उगविण्याचा निश्चय केला. त्याने वजिराला बोलावले आणि आपली आज्ञा फर्मावली.

"रोज संध्याकाळी माझ्यासमोर सुंदर आणि तरुण मुलगी आणा. तिच्याबरोबर माझे लग्न लागेल. दुसऱ्या दिवशी सकाळी मी तिला आपल्या स्वाधीन करीन. तुम्ही ताबडतोब तिचा वध करायचा आणि संध्याकाळी माझ्यासमोर दुसरी सुंदर मुलगी हजर करायची. यात कसूर झाल्यास तुला फाशीची शिक्षा होईल." बिचारा वजीर आणि त्याचे सेवक बादशहापुढे काय बोलणार ? बादशहाचा हुकूम त्यांना पसंत नव्हता, तरी पाळणे आवश्यक होते. राज्यात फिरून ते बादशहाकरिता सुंदर सुकुमार मुली आणीत आणि दुसऱ्या दिवशी बादशहा त्यांना मारून टाकण्याचा हुकूम फर्मावीत असे. रोज रोज घडणाऱ्या या वाईट कृत्यामुळे वजिराचे मन विषण्ण झाले होते. घरी येऊन अन्नपाणी

न घेता तो विचार करीत बसू लागला. या वजिराला दोन अतिशय देखण्या व चतुर मुली होत्या. एकीचे नाव होते शाहजादी व दुसरीचे नाव होते दिनारजादी. एक दिवस त्यांनी वडिलांना त्यांच्या दु:खाचे कारण विचारले. वजिराने सर्व हकीगत त्या दोघींना सांगितली. दोघींनाही आपल्यासारख्याच सुंदर व सुकुमार मुली त्यांचा काहीही दोष नसताना बादशहाच्या लहरी व अविचारी वागण्यामुळे मारल्या जात आहेत याचे दु:ख झाले. 'हे कुठेतरी थांबले पाहिजे' दोघींनाही वाटू लागले. दोघीही त्यावर उपाय शोधू लागल्या. अखेर त्यांना मार्ग सापडला. शाहजादी दिनारजादीला म्हणाली, "दिनारजादी, मला एकापेक्षा एक सुंदर अद्भुत गोष्टी स्वत: रचून दुसऱ्याला रंगवून सांगण्याची एक दैवीशक्ती आहे. तिचा उपयोग मी या कामी करणार आहे. तू मला मदत कर. मी बादशहाशी लग्न करीन आणि तुलाही महालात बोलावून घेईन. पहाटेच्या सुमारास तू मला गोष्ट सांगण्याचा आग्रह करायचा. माझी शेवटली इच्छा म्हणून मी बादशहाजवळून गोष्ट सांगण्याची परवानगी मागून घेईन आणि त्यालाही गोष्ट ऐकण्याची विनंती करीन. तो गोष्ट ऐकण्यात इतका रंगून जाईल की त्याला गोष्ट ऐकण्याचा नादच लागेल आणि एक दिवस तो मला ठार मारण्याचा विचारच सोडून देईल. ईश्वर आपल्याला या कामी यश देईल आणि सुंदर तरुण मुलींवर आलेलं संकट टळेल. जर मी या कामी अपयशी झाले तर आपल्यासारख्या सुंदर तरुण मुली वाचविण्याचा प्रयत्न करताना आपणास मरण आले असे समजेन मी. पण हे हत्याकांड नुसतं पहात न बसता काहीतरी प्रयत्न करू."

दुसऱ्या दिवशी शाहजादी वजिरासमोर उभी राहिली आणि म्हणाली, "आब्बा, आतापर्यंत आपण दुसऱ्यांच्या मुली बादशहापुढे हजर केल्यात. आता तुमच्या या मुलीला बादशहापुढे उभी करा. मी मरणाला घाबरत नाही. पण मी नक्कीच यशस्वी होईन. मी मरणार तर नाहीच पण या कामी मी यशस्वी झाले तर आपल्या सुरस गोष्टींनी 'हजारो मुलींचे प्राण वाचविणारी बेगम शाहजादी' म्हणून माझा नावलौकिक होईल."

आपल्या मुलीची इच्छा ऐकून वजिराला खूपच वाईट वाटले. त्याने तिची समजूत घालण्याचा खूप प्रयत्न केला. परंतु आपल्या निश्चयापासून ती ढळली नाही. शेवटी नाइलाज म्हणून वजिरानं आपली लाडकी लेक शाहजादी हिला बादशहापुढे नेऊन उभी केली. नेहमीच्या पद्धतीने बादशहाने शाहजादीबरोबर लग्न लावले. शाहजादी अतिशय सुंदर आणि बोलण्यात पटाईत होती. न घाबरता ती बादशहाला म्हणाली,

"महाराज, उद्या सकाळी तर मी मरणारच तेव्हा माझ्या बहिणीला, दिनारजादीला आपल्या राजवाड्यात बोलावून घ्या. म्हणजे उद्या मरण्यापूर्वीही मला तिची अखेरची भेट घेता येईल. राजाने लगेच दिनारजादीला आपल्या महालात बोलावून घेतले. दोघी बहिणी एकमेकींना भेटल्या. आपल्या शयनगृहात जाण्यापूर्वी शाहजादीने दिनारजादीच्या कानात हळूच काहीतरी सांगितले.

दुसऱ्या दिवशी पहाटे दिनारजादीने शाहजादीच्या शयनगृहाशी येऊन तिला मोठमोठ्याने हाका मारल्या. बादशहाही जागा झाला. दिनारजादी म्हणाली,

"ताई, दिवस उजाडताच तू मरणार, तेव्हा माझी अखेरची इच्छा पूर्ण कर. तुला अद्भुत गोष्टी खूप छान सांगता येतात

त्यापैकी एक मला उजाडेपर्यंत सांग ना!'' शाहजादीने बादशहाकडे पाहिले आणि बादशहाने या गोष्टीला लगेच होकार दिला. गोष्ट ऐकण्यासाठी बादशहाही आरामात बसला. शाहजादीने मनोमन परमेश्वराचे नाव घेतले आणि आपल्या गोष्टीला सुरुवात केली. बादशहा आणि दिनारजादी गोष्ट ऐकण्यात रमून गेले. पहाट सरली, दिवस उगवूनही बराच वेळ झाला तरी गोष्ट पुढे चालूच होती. गोष्ट संपताच बादशहा भानावर आला. इतक्यात दिनारजादी म्हणाली, ''महाराज, शाहजादीला आणखीही खूप छान छान गोष्टी माहिती आहेत.'' बादशहाही शाहजादीच्या गोष्टीत रमून गेला होता. त्याला शाहजादीकडून आणखी गोष्ट ऐकण्याची इच्छा झाली. त्यानी शाहजादीला मारण्याचे दुसऱ्या दिवसावर ढकलले. दुसऱ्या दिवशी दुसरी कथा सुरू झाली. बादशहाला आणखीही पुढल्या नवीन नवीन गोष्टी ऐकाव्यात असे वाटू लागले. एक हजार एक रात्री दररोज हाच क्रम चालू राहिला. आता राजा शाहजादीच्या या कथाकथन कलेवर एकदम खूष झाला. इतक्या हुशार आणि सुंदर बेगमला मारायला त्याचा जीव होईना. अखेर त्याने आपला हुकूम रद्द केला. थोड्याच वेळात ही बातमी सर्वत्र पसरली. वजिराला आणि दिनारजादीलाही खूप आनंद झाला. पुढे शाहजादीने बादशहाबरोबर अनेक वर्षे संसार केला. शाहजादीने बादशहाला सांगितलेल्या या अद्‌भुत सुरस कथा अरबी भाषेत लिहिल्या गेल्या असून त्या कथांची अनेक भाषांत भाषांतरे झाली आहेत. त्यापैकी काही निवडक कथा आपण या पुस्तकात वाचणार आहात.

२

# अलीबाबा आणि चाळीस चोर

इराण देशाच्या एका छोट्याशा गावात कासिम आणि अलीबाबा या नावाचे दोन भाऊ राहात असत. दोघांची घरे व संसार वेगळा होता. कासिमच्या बायकोकडील माणसे श्रीमंत असल्यामुळे कासिमला त्यांची भरपूर मदत होत असे. त्यामुळे कासिमही श्रीमंती थाटात राहात असे. त्याच्या घरात नोकर-चाकर व दास-दास्याही होत्या. अलीबाबा मात्र गरीब होता. त्याच्याकडे फक्त तीनच खेचरे होती. त्यांना घेऊन तो दररोज रानात जायचा. लाकडे तोडून खेचरांवर लादायचा व घरी येऊन पुन्हा गावात जाऊन लाकडे विकायचा.

एका दिवसाची गोष्ट. अलीबाबा नेहमीप्रमाणे आपली खेचरे घेऊन रानात गेला होता. आज तो लाकडे तोडण्यासाठी बराच आत गेला. लाकडे तोडता तोडता एकाएकी त्याला घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकू आला. त्याने ताबडतोब लाकडे तोडणे बंद केले. खेचरांना दूर नेऊन एका झाडाखाली उभे केले आणि स्वत: एका दूरच्या झाडावर चढून बसला. ते झाड हिरव्यागार पानांनी भरलेलं होतं. एका फांदीआड लपून पुढे काय होतंय ते तो पाहू लागला. इतक्यात एकापाठोपाठ एक चाळीस घोडेस्वार त्याच्या झाडापासून जवळच उतरले. नंतर एक अतिशय धिप्पाड, उंच, लांब मिशा असलेला घोडेस्वार खाली उतरला. तो त्या चाळीस घोडेस्वारांचा नायक होता.



कारण तो त्या इतर घोडेस्वारांना एकामागे एक आज्ञा करीत होता. भराभर घोड्यांच्या पाठीवरून थैल्या खाली उतरविल्या गेल्या. 'एवढं काय भरून आणलंय् यांनी!' अलीबाबा झाडावर बसून विचार करीत होता. इतक्यात तो नायक पुढे झाला. जवळच्या शिळेवर हातातली काठी आपटून तो म्हणाला, 'तिळा उघड.' त्याबरोबर ती शिळा बाजूला झाली. आत बरीच मोठी गुहा होती. थैल्या पाठीवर लादून ते सर्वजण गुहेत शिरले. 'तिळा लाव' अलीबाबाच्या कानावर शब्द आले आणि ती शिळा पुन्हा आपल्या जागेवर सरकली. इथं नक्कीच काहीतरी गडबड आहे. ते चाळीस घोडेस्वार नक्कीच चोर असणार आणि तो लांब मिशीवाला त्यांचा नायक असणार. अलीबाबा स्वत:शीच पुटपुटला आणि पुढे काय होतंय् ते पाहाण्यासाठी तिथंच बसून राहिला. बऱ्याच वेळानंतर ते सर्वजण गुहेतून बाहेर आले. नायक खडकावर काठी ठेवून 'तिळा लाव' म्हणाला. शिळा पुन्हा जागेवर गेली. सर्वजण आपल्या घोड्यावर स्वार होऊन निघून गेले. अलीबाबा हळूच झाडावरून खाली उतरला. त्या गुहेत आहे तरी काय ते पाहाण्याची त्याला तीव्र इच्छा झाली. हातातली काठी खडकावर धरून तो बोलला, 'तिळा उघड'. त्याबरोबर ती शिळा बाजूला झाली. अलीबाबाने गुहेत डोकावून पाहिले. आत बऱ्याच थैल्या एकावर एक रचून ठेवलेल्या दिसत होत्या. रेशमी कापडाचे गठ्ठे पडले होते. एका कोपऱ्यात सोन्या-चांदीच्या दागिन्यांचा ढीग होता. सोन्या-रूप्याची भांडी बाजूच्या झरोक्यातून येणाऱ्या किरणांमध्ये चमकत होती. ''म्हणजे हे सर्व चोर असणार आणि तो मिशीवाला त्या चोरांचा नायक. चोरून आणलेला माल इथं

दडवलाय चोरांनी!'' अलीबाबा स्वत:शीच पुटपुटला आणि तो हातातली काठी खडकावर धरून 'तिळा लाव' म्हणाला. त्याबरोबर खडक जागेवर गेला. अलीबाबानं आपली तिन्ही खेचरे खडकाजवळ आणून उभी केली. खडकावर काठी धरून तो म्हणाला, 'तिळा उघड'. खडक बाजूला झाला. अलीबाबा गुहेत उतरला. त्याने त्या थैल्या निरखून पाहिल्या. त्यात सोन्याच्या मोहरा होत्या. भराभर त्याने पाच-सहा थैल्या उचलून बाहेर आणल्या. बाहेर येऊन 'तिळा लाव' बोलून गुहेचे दार बंद केले. तीन खेचरांवर थैल्या लादून त्याने त्यावर लाकडे रचली आणि तो आपल्या घराकडे परतला. घराच्या दरवाजात अलीबाबाची बायको त्याची वाट पाहात उभी होतीच. अलीबाबाने सावधगिरीने मोहरांच्या पिशव्या घरात नेल्या. घरातच मोठा खड्डा खणून सर्व मोहरा त्यात भरून ठेवण्याचा त्याचा विचार होता. मोहरा पाहून अलीबाबाची बायको खूपच खूष झाली होती. तिचा आनंद गगनात मावत नव्हता. अलीबाबा तिला पुन्हा पुन्हा बजावत होता, ''ही गोष्ट कुणालाही सांगू नकोस.'' पण त्याच्या बायकोला एवढी मोठी संपत्ती कुठं ठेवू नी कुठं नको, असे झाले होते. ती अलीबाबाला म्हणाली, ''ही नाणी तर आपल्याला मोजता येणार नाहीत तेव्हा आपण ती मापट्याने मापून ठेवू.'' अलीबाबा काही बोलण्याच्या आत ती आपल्या जावेकडे, कासिमच्या बायकोकडे माप आणायला गेली देखील.

''धान्य मोजायला माप द्या. लगेच परत आणून देते.'' ती कासिमच्या बायकोला म्हणाली. आपली जाऊ आज बरीच खूष दिसतेय आणि आज मापानं मोजण्यासारखं धान्यतरी कसलं

आणलंय आपल्या दिरानी! तिला फार मोठी उत्सुकता लागून राहिली. जावेला माप देताना मापाच्या तळाला तिनं हळूच मेण लावून ठेवलं.

अलीबाबाची बायको माप घेऊन घरी आली. तोवर अलीबाबानं खड्डा खणून तयार केला होता. अलीबाबाच्या बायकोनं भराभर मापटी भरून मोहरा खड्ड्यात ओतल्या. अलीबाबानं वर माती लोटून जमीन सारखी केली. अलीबाबाची बायको आपल्याच नादात मापटे घेऊन जावेकडे गेली व माप तिच्या स्वाधीन करून धावतच घराकडे परतली. आता आपण खूप श्रीमंत होणार! मोठ्या महालात राहाणार! नोकर-चाकर, दास-दासी कशाकशाला काही कमी नसणार! ती आपल्याच मनोरथात मग्न होती.

इकडे कासिमच्या बायकोने मापट्यात डोकावले. पहाते तर मापाच्या तळाला एक सोन्याची छोटी मोहर चिकटलेली. तिनं ती मोहर बाहेर काढली. रात्री कासिम घरी आल्यावर हातातली मोहर त्याला दाखवीत ती म्हणाली, ‘‘तुमच्या भावाला, अलीबाबाला नक्कीच गुप्तधन सापडलंय. अगदी मापानं मोजमाप करण्याइतकं भरपूर सापडलंय्. तुम्ही ताबडतोब त्याच्याकडे जाऊन सर्व माहिती काढून आणा. कासिमलाही धनदौलतींची हाव होती. तो धावतच अलीबाबाच्या घरी आला आणि त्याला खोदून खोदून गुप्तधनाविषयी विचारू लागला. अलीबाबानं त्याला काहीही न सांगण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ. हातातली मोहर अलीबाबाला दाखवीत तो म्हणाला, ‘‘तुला सोन्याच्या मोहरा सापडल्या असल्याचा हा पुरावा आहे. तुझ्या बायकोने आमच्याकडून आणलेल्या मापट्याला ही मोहर चिकटली होती.

आता बऱ्या बोलानं सर्व खरं सांग नाहीतर तुला सोन्याच्या मोहरा सापडल्या आहेत असं कोतवालाला कळवीन. तो घेऊन जाईल तुझ्या सर्व मोहरा.'' आपल्या मूर्ख बायकोमुळे आपल्यावर हे संकट ओढवलेय्. आता खरं सांगण्यावाचून गत्यंतरच नाही. अलीबाबानं सर्व हकीगत काहीही न लपविता कासिमला सांगितली.

दुसऱ्या दिवशी कासिम आपली दहा बारा खेचरे घेऊन धनाच्या शोधार्थ निघाला. अलीबाबानं सांगितलेल्या सर्व खाणाखुणा पटल्या. त्याने आपली खेचरे त्या खडकाजवळच उभी केली आणि हातातली काठी खडकावर ठेवून 'तिळा उघड' म्हणाला. त्याबरोबर गुहेवरील शिळा बाजूला झाली. कासिम झटपट गुहेत शिरला. शिळा पुन्हा जागेवर आली. गुहेतील धनाच्या राशी पाहून तो चांगलाच बावरून गेला. हे घेऊ का ते घेऊ असे त्याला झाले होते. बऱ्याच थैल्या त्याने गुहेबाहेर काढण्यासाठी बाजूला केल्या. एका मोठ्या थैलीत दागिने भरून घेतले. रेशमी कापडाचे गठ्ठेही बाहेर काढण्यासाठी तयार केले. बाहेर पडण्यासाठी त्याने खडकाला काठी लावली परंतु गुहेवरील शिळा बाजूला सरकण्यासाठी जे बोलायला हवे ते तो विसरला. काही केल्या त्याला तो शब्द आठवेना. काय करावे हे त्याला सुचेना. जसजसा उशीर होऊ लागला तसतसा चोर परत येतील या भीतीनं तो आणखीनच बेचैन झाला. गुहेच्या एका कोपऱ्यात तो बसून राहिला. इतक्यात गुहेवरची शिळा बाजूला होऊन ते चाळीस चोर त्यांच्या नायकासकट आत घुसले. बाहेर उभी केलेली खेचरे आणि आत दडून बसलेला कासिम पाहून चोर चपापले. म्हणजे कुणीतरी चोरावर

मोर आपल्यावर पाळत ठेवून आहे तर...! त्यांनी एकमेकांकडे पाहिलं. चोरांच्या नायकाने एका चोराला कासिमला ठार मारण्याची आज्ञा दिली. कासिमला मारून त्याचे तीन तुकडे करण्यात आले आणि तीन ठिकाणी टांगून ठेवले गेले.

इकडे संध्याकाळ झाली तरी कासिम घरी आला नाही म्हणून कासिमची बायको अलीबाबाकडे चौकशीला आली. अलीबाबाने तिला रात्रभर वाट पाहायला सांगितली. रात्रीही कासिम घरी आला नाही म्हणून ती रडत रडत पुन्हा अलीबाबाकडे आली. दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे अलीबाबा आपली खेचरे घेऊन जंगलात आला. खेचरे दूर उभी करून तो झाडावर जाऊन बसला. नेहमीप्रमाणे चोर आले. गुहेत शिरले. थोड्या वेळाने सर्वजण बाहेर निघून गेले. अलीबाबा गुहेत शिरला. पाहतो तर कासिमच्या प्रेताचे तुकडे टांगलेले! झटपट त्याने ते तुकडे काढून जवळच्या मोठ्या रुमालात बांधले आणि तो बाहेर आला. 'तिळा लाव' म्हणताच गुहेवर शिळा येऊन बसली. कुणाला संशय येऊ नये म्हणून त्याने खेचरांवर लाकडे लादली व त्याखाली कासिमच्या प्रेताचे तुकडे असलेला रुमाल लपविला. कासिमच्या घरी जाऊन त्यानं सत्य हकिगत कासिमच्या बायकोला आणि तिची चतुर दासी मार्ग्याना हिला सांगितली. मार्ग्यानाने प्रेत कुजू नये म्हणून झटपट त्यावर औषध मारले. कासिमला चोरांनी ठार केले ही गोष्ट आजुबाजूला कुणालाही कळता उपयोगी नव्हती. तसेच आपल्या गुहेतून नाहीसे झालेले प्रेताचे तुकडे कुणाच्या घरात आहेत याचा सुगावा चोरांनाही लागता उपयोगी नव्हता. नाहीतर चोर गावात शिरतील आणि सर्वांचाच प्राण धोक्यात येईल. जे काही करायचे ते

नीट विचार करून चतुराईने करणे आवश्यक होते. कासिमची बायको बिचारी कपाळाला हात लावून बसली. परंतु मार्ग्याना चपळाईने अलीबाबाला मदत करू लागली. नंतर ती धावत पळत एका हकिमाकडे गेली. हकिमाकडे तिने आपल्या धन्याच्या आजाराचं खोटं खोटं वर्णन केलं. आपला मालक मरणाच्या पंथाला लागला असून तो थोड्याच दिवसाचा सोबती आहे. परंतु त्याचा आजार वाढेल म्हणून हकिमानं त्याला कुणालाही भेटायला मनाई केली आहे. त्यामुळे कुणीही त्याला भेटायला येऊ नये मात्र परमेश्वराकडे त्याच्यासाठी दुवा मागावा. रस्त्यात भेटणाऱ्या ओळखीच्या लोकांना मार्ग्याना सांगत सुटली. हकिमानं दिलेली औषधे घरी ठेवून आणखी एक बुरखा आणि सोबत शंभर सोन्याच्या मोहरा घेऊन ती बाहेर पडली आणि गावचा एक हुशार आणि प्रसिद्ध चांभार 'बाबा मुस्तफा' याच्या दुकानात गेली. बाबा मुस्तफाला एका बाजूला घेऊन तिनं त्याच्या हातात शंभर मोहरा कोंबल्या आणि त्याला आपल्या सोबत चलण्याची विनंती केली. बाबा मुस्तफा आपली चामडे शिवण्याची बॅग सोबत घेऊन तयार झाला. मार्ग्यानाने सोबत आणलेला बुरखा बाबा मुस्ताफाच्या अंगावर चढविला. थोडे अंतर चालून गेल्यावर बाबा मुस्ताफाला घेऊन ती एका बाजूला गेली. आजुबाजूला कोणी नाही असे पाहून तिने त्याचे डोळे बांधले आणि त्याला घेऊन घरी आली. एका बंद खोलीत बाबा मुस्ताफाकडून तिने आपल्या धन्याच्या शरीराचे तुकडे शिवून घेण्यास अलीबाबाला मदत केली. नंतर तिने चांभार बाबा मुस्ताफाला दूरवर नेऊन सोडले. तोपर्यंत अलीबाबानं आपल्या भावाचं प्रेत जमिनीवर चादर अंथरून व्यवस्थित ठेवलं. नंतर त्या सर्वांनीच कासिम

मेला म्हणून मोठ्यानं रडायला सुरुवात केली. आजुबाजूची माणसे धावत आली. ताबडतोब कासिमच्या दफनाची तयारी करून काळजीपूर्वक त्याचा दफनविधी उरकला गेला. पुढचा एक महिना दु:खातच गेला.

इकडे चोर गुहेत शिरून पहातात तो प्रेताचे तुकडे गायब झालेले. म्हणजे आणखी कुणाला तरी आपल्या गुहेचा सुगावा लागलेला आहे. चोरांनी बरोबर ओळखले व ते अधिक सावधपणे राहू लागले. ज्याला आपल्या गुहेचा पत्ता कळलाय् त्याला शोधून काढल्याखेरीज त्यांना चैन पडेना. आजुबाजूच्या गावात चौकशीकरिता ते फिरू लागले.

मध्यंतरी अलीबाबाने कासिमच्या बायकोच्या संरक्षणासाठी तसेच तिची संपत्तीही सुरक्षित राहावी म्हणून तिच्या संमतीनेच तिच्याशी विवाह केला. आता तो आपल्या मुलांना आणि पहिल्या बायकोला घेऊन कासिमच्या घरात राहू लागला. आपल्या जुन्या घरात पुरलेल्या सर्व मोहरा त्याने आपल्यासोबत आणल्या. आता तो व्यापार करू लागला. त्याने मोठमोठी घरे बांधली. त्याला पैसा सारखा मिळतच राहिला. त्याने भरपूर दानधर्मही केला. त्यामुळे त्याचे नाव अगदी दूरवरच्या शहरांपर्यंत पोहोचले.

शोध घेत घेत एक दिवस ते चाळीस चोर व त्यांचा नायक त्या गावात आले. हळूहळू ते चौकशी करीत होते. अचानक त्यांची गाठ बाबा मुस्ताफा चांभाराशी पडली. त्याला बऱ्याच मोहरांचे आमिष दाखवून नायक त्याच्याकडून माहिती काढून घेत होता. बोलता बोलता नायक म्हणाला, ‘‘बाबा, तुम्ही किती बारीक काम करता आहात. त्यात तुमचं वयदेखील

झालंय्. तुम्हाला दिसतं का हो?'' बाबा मुस्ताफा खुशीत येऊन म्हणाला, ''अरे बाबांनो, काही दिवसांपूर्वी मी एका प्रेताचे तीन तुकडे अगदी बरोबर शिवले, डोळ्यावर पट्टी बांधून. माझ्या डोळ्यापेक्षा माझे तरबेज हातच जास्त काम करतात.'' बाबा मुस्ताफाचे बोलणे ऐकून आपल्या गुहेची माहिती असलेली व्यक्ती नक्की याच गावात राहते, तेव्हा इथेच तिचा शोध घ्यायला हवा असे चोर आणि नायक यांचे ठाम मत झाले. त्या चोरांपैकी एक चोर बाबा मुस्ताफाच्या बाजूला बसून म्हणाला, ''बाबा, ज्या घरात तुम्ही प्रेत शिवलेत ते घर आम्हाला जरा दाखवाल का? नाही म्हणजे आम्ही तुम्हाला आणखी खूष करू. तुम्हाला हे असं कष्टाचं काम करावंच लागणार नाही.'' त्याने बाबा मुस्ताफाच्या हातावर आणखी मोहरा ठेवल्या.

दुसऱ्या दिवशी रात्री बाबा मुस्ताफा त्या चोरांपैकी दोघांबरोबर गावात फिरला आणि त्याने अंदाजाने त्यांना एक घर दाखविले. मात्र ते बरोबर कासिमचेच होते. वेळ रात्रीची होती. चोरांनी कासिमच्या घरावर खुणेची फुली करून ठेवली.

नेहमीप्रमाणे भल्या पहाटे मार्गीना उठली. आपली सर्व कामे आटोपल्यावर मार्गीनाने नेहमीच्या सवयीनेच सर्व घरावर व आजुबाजूच्या परिसरावर नजर फिरवली आणि आपल्या घरावरची एक भली मोठी पांढरी फुली पाहून तिला आश्चर्याचा धक्का बसला. नक्कीच कुणीतरी आपल्या धन्याच्या मागावर असणार! तिने बरोबर ओळखले आणि क्षणाचाही विलंब न लावता आजुबाजूच्या बऱ्याच घरांवर तशाच पांढऱ्या फुल्या करून ठेवल्या.

दिवस बराच वर आल्यानंतर साधारण दुपारच्या सुमारास दोन चोर नायकाला घेऊन कासिमच्या घराजवळ आले आणि त्या भागात फिरून दारावर फुली केलेले घर शोधू लागले. पाहातात तो बऱ्याच घरांवर पांढऱ्या फुल्या. त्यामुळे त्यांना नक्की कोणते घर ते समजेना. बरोबर माहिती न दिल्यामुळे त्या दोन चोरांना मात्र नायकाने चांगला चोप दिला आणि पुन्हा नीट काम करण्याबद्दल बजावले.

दुसऱ्या दिवशी रात्री पुन्हा दोन चोर बाबा मुस्ताफाकडे गेले. त्यांनी त्याला पुन्हा एकवेळ ते घर दाखविण्याची विनंती केली. बाबा मुस्ताफाने त्यांना घर दाखविताच चोरांनी त्या घरावर एक वेगळ्याच आकाराची खूण केली आणि ते परत फिरले. दुसऱ्या दिवशी मार्ग्यांना नेहमीप्रमाणे घराचे निरीक्षण करीत असता तिला ती खूण दिसली. लगेच तिने आजुबाजूच्या घरांवरही तशाच खुणा केल्या. दुपारच्या सुमारास चोर पुन्हा नायकाला घेऊन आले, परंतु सर्वच घरांवर सारख्याच फुल्या पाहून पुन्हा गोंधळले. आता चोरांचा नायक स्वत: बाबा मुस्ताफाकडे गेला. त्याच्या मदतीने त्याने कासिमचे घर बरोबर हेरून ठेवले आणि त्या घरात कसे शिरावे याची युक्ती तो शोधू लागला. विचार करता करता त्याला एक नामी युक्ती सुचली. शेजारच्या बाजारात जाऊन त्यानी एकोणीस खेचरे व अडतीस बुधले खरेदी केले. त्यापैकी एक बुधला तेलाने काठोकाठ भरून घेतला. सदतीस बुधले रिकामे होते. प्रत्येक बुधल्याचे तोंड त्याने मुद्दामच मोठे करून घेतले होते. या प्रत्येक बुधल्यात एकेक चोर त्याने तीक्ष्ण हत्यार घेऊन बसविला. आत हवा जाण्यासाठी बुधल्याची शिवण मधे मधे उसवून

ठेवली. प्रत्येक खेचरावर दोन दोन बुधले लादून दिवे लागताच तो कासिमच्या घरावरून जाऊ लागला. अलीबाबा आपल्या बाहेरच्या ओटीवर आराम करीत बसला होता. त्याला सलाम ठोकून चोरांचा नायक म्हणाला,

''शेटजी, उद्याच्या बाजारात विकण्यासाठी तेल घेऊन चाललोय. पण अजून बराच पल्ला गाठायचा आहे. बऱ्याच दूरवरून आल्यामुळे मी व माझी खेचरेही थकून गेलो आहोत. रात्रीसाठी राहाण्यापुरती जागा मिळेल तर फार उपकार होतील. उद्या पहाटे पुन्हा प्रवासाला निघू.''

अलीबाबा बिचारा भोळा आणि उदार मनाचा होता. त्याने आपल्या दोन तीन गुलामांना हाका मारून खेचरांवरून बुधले उचलून मागच्या रिकाम्या दालनात ठेवायला सांगितले. खेचरांना दाणापाणी घालण्याची आज्ञा दिली. पाहुण्याला घेऊन तो समोरच्या दालनात बसला. पाहुण्याच्या जेवणाची व त्याच्या अंथरुण-पांघरुणाची व्यवस्था त्याने आपली दासी मार्ग्यानावर सोपविली. थोड्याच वेळाने अलीबाबाने पाहुण्याबरोबर यथेच्छ भोजन घेतले आणि तो विश्रांतीकरिता आपल्या शयनगृहात गेला. झोपण्यापूर्वी एकवेळ सर्व बुधले नजरेखाली घालावेत असा बहाणा करून चोरांचा नायक मागच्या दालनात आला. एकेक बुधल्याजवळ वाकून त्याने चोरांना सूचना दिली.

''आपण ज्या माणसांच्या शोधात आहोत, तोच हा माणूस आहे. मध्यरात्री मी आपणास खडे मारीन त्याबरोबर हातातल्या शस्त्राने बुधला फोडून बाहेर या.''

चतुर मार्ग्याना दुरून पाहुण्याचे निरीक्षण करीत होती. तिला थोडासा संशय आला. पाहुणा आपल्या खोलीत निघून गेला.

वाड्यावरचे नोकर-चाकरही झोपायला गेले. उद्याच्या स्वयंपाकाच्या तयारीचे निमित्त करून ती स्वयंपाकखोलीत जागीच राहिली.

नंतर ती त्या प्रत्येक बुधल्याजवळ गेली. पहिला बुधला तेलाने भरलेला होता. तिनं हातातल्या शस्त्रानं त्याचं तोंड फाडलं. नंतर ती पुढच्या प्रत्येक बुधल्याजवळ गेली. आतून आवाज आला, "बाहेर येऊ का?" नायकाचा आवाज काढून तिने उत्तर दिले, "नको, अजून उशीर आहे." मात्र हातातल्या शस्त्रानं तिनं प्रत्येक बुधल्याचं तोंड फाडून ठेवलं. अर्धवट गुंगीत आणि गुदमरलेल्या स्थितीत असलेल्या बुधल्यातील चोरांना ते समजलंच नाही.

थोड्या वेळाने तिनं स्वयंपाकघरातील एक मोठा चुलाणा पेटविला आणि त्यावर मोठी कढई ठेवली. नंतर एक पसरट भांडे सोबत घेऊन तिने पहिल्या बुधल्यातील बरेच तेल बाहेर काढले. ते चुलाण्यावरील कढईत चांगले उकळविले आणि ते नरसाळ्यासारखे तोंड असलेल्या भांड्यात घेऊन बुधल्यांजवळ आली. बुधल्यांमध्ये कोणतीच हालचाल नव्हती. चोरांना चांगलीच झोप लागली होती. मार्ग्यानाने भराभर हातातल्या भांड्यांतील उकळते तेल प्रत्येक बुधल्यात ओतले. चोरांच्या टाळूवरच उकळते तेल पडल्यामुळे काही हालचाल करण्याआधीच ते मृत्युमुखी पडले.

मार्ग्याना आपल्या खोलीत आली. परंतु रात्रभर ती झोपली नाही. दाराला कडी लावून आतील खिडकीतून पुढे काय घडते ते ती पाहू लागली. मध्यरात्र उलटून जाताच चोरांचा नायक बुधल्यावर दगड मारू लागला, परंतु कोणीही बाहेर येईना.

चोरांना बहुतेक झोप लागली असणार असे समजून तो स्वत: तिथं येऊन बुधले हालवू लागला. पहातो तो चोर मेलेले. "म्हणजे आपलं कारस्थान कुणाच्यातरी लक्षात आलंय्." तो स्वत:शीच पुटपुटला आणि वाड्याच्या भिंतीवरून उडी मारून पसार झाला.

सकाळी अलीबाबा उठून पहातो तो बुधले अस्ताव्यस्त स्थितीत तिथेच पडलेले. त्याने मार्ग्यानाकडे चौकशी केली. मार्ग्याना म्हणाली, "महाराज ईश्वरकृपेने तुमच्या कुटुंबावरील संकट टळले. या बुधल्यात तेल नाही. हत्यारबंद चोर आहेत. पण आता ते सर्व मेलेत आणि त्यांचा नायक म्हणजे तो पाहुणा या भिंतीवरून पळून गेलाय. पण तुम्हाला अजूनही त्याच्यापासून धोका आहे. सावध राहा." नंतर तिने आपण त्या चोरांना कसे मारले त्याची हकिगत अलीबाबाला सांगितली. अलीबाबा अतिशय चतुर, प्रामाणिक आणि स्वामीनिष्ठ मार्ग्यानावर खूष झाला. त्याने तिला भरपूर धन दिले आणि तिच्या प्रामाणिकपणाबद्दल तिला सर्वात मोठे बक्षीस देण्याचेही आश्वासन दिले. दयाळू अलीबाबाने त्या चोरांचे मृतदेह आपल्या गुलामांच्या साहाय्याने आपल्या बागेत पुरून टाकले. मार्ग्यानामुळं अलीबाबाच्या कुटुंबावरील फार मोठे संकट टळले होते म्हणून त्याच्या कुटुंबातील स्त्रियाही मार्ग्यानावर खूष होत्या.

इकडे तो नायक आपल्या गुहेत येऊन आपले सर्व सोबती मेले म्हणून बराच वेळ रडला. फक्त त्याचे तीन चोर सोबती कुठंतरी पळून गेले होते ते पुन्हा परत आलेच नाहीत. थोड्या दिवसांनी नायकाने पुन्हा एकवेळ अलीबाबाला व त्याच्या कुटुंबाला ठार करण्याचा विचार केला. त्यासाठी अलीबाबाच्या

घरात त्याला प्रवेश हवा होता. त्याने काही माणसे आपल्या हाताशी घेऊन अलीबाबाच्या मुलाच्या दुकानाशेजारी कापडाचे दुकान घातले. हळूहळू त्याने अलीबाबाच्या मुलाशी मैत्री वाढविली. आता तो त्याला आपल्या घरीही जेवायला बोलावू लागला. एक दिवस नायकाने अलीबाबाच्या मुलाजवळ अलीबाबाला भेटण्याची इच्छा प्रगट केली. अलीबाबाच्या मुलाने ती लगेच मान्य केली.

अलीबाबाच्या घरी पाहुणचाराचा दिवस ठरला. अलीबाबाने पाहुण्यांच्या पाहुणचाराची व्यवस्था आपली चतुर दासी मार्ग्यानावर सोपविली. मार्ग्याना कामाला लागली. पाहुणे आणि त्याचे दोन साथीदार गप्पा मारीत मुख्य दालनात बसले. बोलता बोलता पाहुणा म्हणाला,

"अलीकडे आमची प्रकृती बरी नसते, तेव्हा हकीमसाहेबांनी मीठ खाऊ नका म्हणून बजावले आहे. तेव्हा कृपा करून आमच्या जेवणात मीठ घालू नका." भोळ्याभाबड्या अलीबाबानं पाहुण्याची सूचना मार्ग्यानाच्या कानावर घातली. सूचना ऐकून मार्ग्याना मात्र चांगलीच चपापली. 'ज्या घरचे मीठ खातो त्या घराशी बेईमानी करता येत नाही' तिने कुठेतरी ऐकले होते. तिला काही केल्या चैन पडेना. जेवणाची सर्व व्यवस्था हाताखालच्या नोकरांवर सोपवून ती पाहुणा म्हणून आलेल्या व्यापाऱ्याचे निरीक्षण करू लागली. आलेल्या पाहुण्याचा पोशाख आणि चेहरेपट्टीवरील काही ठळक खुणा तिला नकली वाटत होत्या. पाहुण्याच्या डोक्यावरील केसही खरे नसल्याचे तिने ओळखले. तो पूर्वीचा चोरांचा नायकच असल्याचे तिच्या लक्षात आले. त्याचे बोलणे, हसणे, बघणे सर्वच नकली होते. ती

सावध झाली. अलीबाबा, त्याचा मुलगा, सावकार आणि इतर सर्व मंडळी मद्यप्राशनात रंगून गेली होती. सावकार आपल्या धन्याला, त्याच्या मुलाला व त्यांच्या इतर मंडळींना अधिक मद्य पाजून स्वत: मात्र मद्य पीत असल्याचे नाटक करीत होता. मार्ग्यानाने झटपट जेवणाची तयारी केली. जेवण होताच पाहुण्यांच्या करमणुकीसाठी तिने नृत्याचा कार्यक्रम आखला. नृत्य करण्यात ती तरबेज होती. आपल्या पहिल्याच नृत्याने तिने सर्व मंडळींना खूष केले. दुसऱ्या नृत्याकडे सर्वांचे डोळे लागले होते. मार्ग्याना हातात तळपती कट्यार घेऊन आली. कट्यार कवायतीला सुरुवात झाली. अलीबाबाला बरीच नशा चढली होती. त्याचा मुलगाही बेसावध होता. सावकार मात्र सावधपणे सर्व हालचालींवर लक्ष ठेवून होता. इतक्यात मार्ग्याना हातातली कट्यार उपसून त्याच्यावर धावली आणि क्षणार्धात ती कट्यार तिनं त्याच्या छातीत खुपसली. सावकार मोठ्यानं ओरडला. त्याचे साथीदार मार्ग्यानाकडे धावले. त्यांच्यावरही तिने कट्यारीचे वार केले.

अलीबाबा सावध झाला. त्याचा मुलगाही जागेवरून उठला. संतापाने लाल झालेल्या मार्ग्यानाचा हात धरून तो तिला शिक्षा करणार तोच सावकाराचा अंगरखा वर करून त्याने दडवून ठेवलेली कट्यार तिनं त्याला दाखवली. सावकाराच्या डोक्यावरचा नकली टोप उपटून काढला. तोपर्यंत सावकाराचे साथीदार जखमी अवस्थेत पळून गेले. अलीबाबा आणि त्याचा मुलगा आश्चर्याने सर्व पाहात राहिले. मार्ग्यानाने पुन्हा एकदा आपल्या धन्याचे आणि त्याच्या कुटुंबाचे प्राण वाचविले होते. अलीबाबाचे सर्व कुटुंब चतुर आणि स्वामीनिष्ठ मार्ग्यानावर

खूष झाले. तिच्या प्रामाणिकपणाचे बक्षीस म्हणून अलीबाबाने तिचे आपल्या मुलाशी लग्न लावून दिले. मार्ग्यानाची तिच्या दास्यातून मुक्तता झाली. नायकाच्या प्रेताचा दफनविधी उरकल्यानंतर आणखी कोणी त्या गुहेशी संबंध असलेली व्यक्ती आपल्याकडे येते का याची अलीबाबानं वाट पाहिली. परंतु दोन तीन वर्षे उलटून गेली तरी त्याच्याकडे कुणी फिरकला नाही. नंतर मात्र त्या गुप्तधन असलेल्या गुहेची माहिती त्याने आपल्या मुलाला आणि मार्ग्यानाला सांगितली. गरजेपुरते धन बाहेर काढून त्यातून परोपकाराची कामे अलीबाबा आणि त्याचे कुटुंब करू लागले. त्याने आपल्या नोकराचाकरांना आणि गुलाम मंडळींनाही खूष ठेवले. दयाळू आणि दानशूर म्हणून अलीबाबा व त्याची सून मार्ग्याना यांची कीर्ती अगदी दूरपर्यंत पसरली. कित्येक वर्षे त्या परिसरात अलीबाबा व त्याची सून मार्ग्याना दानशूर म्हणून प्रसिद्ध होती.

३१९५ ७।११।९६
बा'बा

३

# पितळी भांड्यातील राक्षस आणि कोळी

समुद्राजवळील एका लहानशा गावात एक कोळी राहात होता. तो अतिशय गरीब, परंतु प्रामाणिक होता. थोड्याशा मिळकतीवर देखील तो संतुष्ट राहात असे. मासे पकडण्यासाठी पाण्यात तो फक्त चारच वेळा जाळे टाकी आणि त्यात जितके मासे मिळतील ते विकून त्यावर संतुष्ट राही.

एका दिवसाची गोष्ट. पाण्यात तीन वेळा जाळे टाकूनही एकही मासा जाळ्यात आला नाही. आता शेवटल्या जाळ्यात काहीच सापडले नाही तर बायकोमुलांनादेखील उपाशी राहावे लागणार होते. चौथे जाळे टाकण्यापूर्वी त्याने देवाचे नाव घेतले आणि जाळे पाण्यावर फेकले. देवाचेच नाव घेऊन तो जाळे ओढू लागला. जाळे बरेच जड लागत होते. परंतु त्यात एकही मासा सापडला नव्हता. मात्र एक तोंड बंद असलेलं पितळी भांडे जाळ्यातून बाहेर पडले. भांडे बरेच जड होते. बरेच प्रयत्न करून त्याने ते भांडे उघडले. त्याबरोबर त्यातून धुराचा लोट बाहेर पडला आणि क्षणार्धात एक काळाकुट्ट उंच धिप्पाड आणि दात बाहेर आलेला राक्षस त्याच्यासमोर उभा राहिला. तो कोळ्याला म्हणाला, ‘‘कोळ्या, तू दुर्दैवी आहेस. कारण ‘मला शंभर वर्षांच्या आत कोण बाहेर काढील त्याला मी राजा करीन’ अशी प्रतिज्ञा केली होती. परंतु कुणीही मला बाहेर काढले नाही. नंतर ‘पुढील शंभर वर्षांत जो मला बाहेर काढील

त्याला पृथ्वीवरील गुप्तधन देईन' अशी प्रतिज्ञा केली होती. परंतु मला कुणीही बाहेर काढले नाही. नंतरच्या शंभर वर्षांत मला जो बाहेर काढील त्याला मी खूप श्रीमंत करण्याची प्रतिज्ञा केली. परंतु तरीही मला कुणी बाहेर काढले नाही. नंतर मात्र मी खूप संतापलो आणि प्रतिज्ञा केली आता जो कोणी मला बाहेर काढील त्याला मात्र मी ठार मारून टाकीन. दुर्दैवानं तू मला बाहेर काढलेस. तुझी मला दया येते. खरं तर तू अतिशय प्रामाणिक आहेस. तू मला बाहेर काढून माझ्यावर उपकार केले आहेस. तरीही मला तुला मारून माझी प्रतिज्ञा पूर्ण करायलाच हवी.'' कोळी घाबरला. आता खरोखरच आपण मरणार असे त्याला वाटू लागले. तरीही शेवटला प्रयत्न करून पाहावा म्हणून तो म्हणाला, ''ठीक आहे राक्षस महाराज. पण मरण्यापूर्वी तुम्ही या भांड्यात कसे आलात ते तरी सांगा.'' राक्षस मोठमोठ्यानं हसला. त्याच्या हसण्याने आभाळात मोठा गडगडाट झाल्यासारखे कोळ्याला वाटले. राक्षस म्हणाला, ''अरे कोळ्या, ती फार मोठी कहाणी आहे. फार पूर्वी देव आणि राक्षस यांची फार मोठी लढाई झाली. या लढाईत आमचा राक्षसांचा विजय होत आला होता, परंतु एकाएकी बाजू उलटली. राक्षस भराभर मरून पडू लागले. देवांना विजय मिळाला. माझ्यासारखे काही राक्षस देवाने पकडून तुरुंगात टाकले. एक दिवस मला तुरुंगातून बाहेर काढून देवांच्या दरबारात उभे करण्यात आले. मला देवांची थट्टा करण्याची लहर आली. लगेच मी माझ्या पायाच्या अंगठ्याजवळची कळ जोरात दाबली. त्याबरोबर माझे धुरात रूपांतर झाले. मात्र मी तिथून बाहेर पडणार तोच देवाच्या एका शिपायाने मला तिथल्याच एका नक्षीदार पितळी


मनोज१९.

भांड्यात पकडले. त्याने ते भांडे धुराच्या दिशेने धरताच आपोआपच माझ्या शरीराचा सर्व धूर भांड्यात जमा झाला. ताबडतोब दुसऱ्या शिपायाने त्यावर झाकण टाकून मला त्या भांड्यात कायमचे बंद केले. भांड्यावर देवांच्या राजाने आपली मुद्रा उठवली आणि मला समुद्रात फेकून दिले.''

''अरे वा! छान! म्हणजे शरीराचे धुरात रूपांतर करण्याची कला तुझ्याकडे आहे, पण मला हे पटत नाही. तुझा एवढा मोठा देह धूर होऊन या भांड्यात कसा राहिला? मला बघू तरी कुठं आहे ती कळ.'' कोळी म्हणाला.

''हात्तेच्या बघ ना.'' राक्षसाने आपला पाय पुढे केला. त्याच्या पायाच्या अंगठ्याच्या बाजूला नळीसारखा मांसाचा भाग पुढे आला होता. कोळी झटकन त्या नळीवर घट्ट पाय देऊन उभा राहिला. त्याबरोबर राक्षसाच्या देहाची धूर होण्याची प्रतिक्रिया सुरू झाली. कोळ्याने झटपट ते भांडे धुरासमोर धरताच सर्व धूर त्या भांड्यात आपोआप जाऊ लागला. कोळ्याने भांड्यावर झाकण घट्ट धरले आणि ते पक्के बसवून तो म्हणाला, ''निर्दय राक्षसा, आता भांड्यातच बस. हे भांडे मी आता समुद्रात फेकून देतो आणि असे भांडे कुणास मिळाल्यास त्यावरील झाकण उघडू नका अशी सूचनाही सर्व कोळ्यांना देऊन ठेवतो. पाहूया तुला कोण बाहेर काढतं ते!'' भांड्यातून मोठमोठ्याने हसण्याचा आवाज आला. ''कोळीदादा, तू हुशार आहेस. तू मला पुन्हा भांड्यात बंद करशील हे माहीत असूनही मी तुला माझ्या पायाची कळ दाखविली. कारण तुझ्यासारख्या प्रामाणिक माणसाला मारणे माझ्या जीवावर आले होते. परंतु मी केलेल्या प्रतिज्ञेमुळे मला तसे करावे लागणार होते. पण

आता मी "मला कुणी या भांड्यातून सोडवील त्याचे दारिद्य दूर करण्याची प्रतिज्ञा केली आहे. तेव्हा मी तुझे नक्कीच चांगले करीन. माझ्यावर विश्वास ठेव." कोळी विचार करू लागला आयुष्यभर दारिद्यात खितपत पडण्यापेक्षा त्यातून आपल्याला या राक्षसाने बाहेर काढले तर आपले आणि आपल्या मुलांचे नक्कीच चांगले होईल. प्रयत्न करून पाहूया. मरण आलेच तर आपले दुर्दैव समजू. त्याने भांड्यावरील झाकण बाजूला केले. त्याबरोबर भांड्यातून धूर बाहेर येऊन थोड्याच वेळात तो धिप्पाड राक्षस हसत हसत त्याच्यासमोर उभा राहिला. ते पितळी भांडे त्याने लाथेने समुद्रात भिरकावून दिले. कोळी घाबरला. पण राक्षस म्हणाला, "कोळीदादा, घाबरू नकोस. माझ्याबरोबर चल. मी तुला एक तळे दाखवतो." कोळी आपली जाळी घेऊन त्याच्यामागे चालू लागला. थोडे दूर गेल्यानंतर ते तळे लागले. त्या तळ्यात रंगीबेरंगी मासे होते. ते पाण्यातूनही दिसत होते. राक्षस म्हणाला, "कोळीदादा, या तळ्यात तू रोज फक्त एकदाच जाळे टाकायचे. जितके मासे मिळतील तितके राजाच्या राजवाड्यावर घेऊन जायचे. तुला भरपूर पैसे मिळतील. लाग तुझ्या कामाला. जातो मी. मात्र लक्षात ठेव, रोज एकदाच जाळे टाकायचे. अतिलोभाने दुसऱ्यांदा जाळे टाकशील तर पुन्हा तुला दारिद्य येईल." राक्षसाने जमिनीवर लाथ मारली. त्याबरोबर जमीन दुभंगली जाऊन त्यात राक्षस गडप झाला. कोळ्याने आपले जाळे तळ्यान टाकले. जाळ्यात चार रंगाचे चार सुंदर मासे आले. ते घेऊन तो राजाच्या वाड्यावर गेला. राक्षसाने सांगितल्याप्रमाणे त्याला खरोखरच चांगले पैसे मिळाले. आता रोज तो त्या तळयावरच जाळे टाकून मासे

पकडून राजवाड्यावर जाऊन विकू लागला. मात्र राक्षसाची तळ्यावर रोज एकदाच जाळे टाकण्याची अट त्याने कटाक्षाने पाळली. त्यामुळे तो सुखी झाला. त्याचे दारिद्र्य थोड्याच दिवसात नाहीसे झाले.

# ४

# बोलणारा पक्षी, गाणारे झाड व सोनेरी पाणी

फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट. तेव्हा इराणच्या गादीवर खुश्रुशाह नावाचा बादशहा राज्य करीत होता. बादशहा आठवड्यातले दोन दिवस वेष पालटून आपल्या वजिराबरोबर आपल्या राजधानीत व आजुबाजूच्या गावातही फिरत असे. असे केल्याने त्याला कितीतरी सत्य गोष्टी समजत असत. शिवाय लोक आपल्याविषयी काय बोलतात तेही ऐकता येई. एका दिवसाची गोष्ट, बादशहा नेहमीप्रमाणे वेष पालटून आपल्या वजिरासह एका मोहल्ल्यातून फिरत होता. एका घरातून त्याला हसण्या-खिदळण्याचा आवाज आला. दोघेही जवळच्याच खिडकीजवळ थांबले. बादशहाने हळूच आत डोकावले. एका मंचावर तीन बहिणी गप्पागोष्टी करीत बसल्या होत्या. बोलता बोलता मोठी म्हणाली, "मला बादशहाचा मुख्य कारभारी आपला नवरा व्हावा असं वाटतंय्. म्हणजे बादशहाच्या महालातल्या छान छान वस्तू पाहिजे तेव्हा मिळू शकतील." मोठ्या बहिणीची इच्छा ऐकून दोघी मोठमोठ्यानं हसल्या. दुसरी म्हणाली,. "मला बाई बादशहाच्या आचाऱ्याशीच लग्न करावंसं वाटतंय्. म्हणजे जिभेचे चोचले हवे तसे पुरवता येतील. रोज पंचपक्वान्नं!" पुन्हा तिघीही हसल्या. तिसरी सर्वांत धाकटी, काहीच बोलत नव्हती. तेव्हा पहिल्या दोघी म्हणाल्या, "हं, आता तू सांग तुझी इच्छा!" थोडंसं गालात हसून धाकटी

बहीण म्हणाली, "इच्छाच करायची तर खूप मोठी इच्छा करायला काय हरकत आहे? मला तर बाई माझं लग्न खुद्द बादशहाशीच व्हावं असं वाटतंय्." तिचं बोलणं ऐकून पहिल्या दोघींनी तिचे गालगुच्चे घेत म्हटले, "वा! वा! होणार हं तू पट्टराणी! अग पण बादशहा कशाला आपल्यापर्यंत येतोय! सगळी मनोराज्य! चला, आता कामाला लागूया. तिघी बहिणी उठून आत गेल्या. बादशहा वजिरासह राजवाड्यात परतला. परत निघताना त्यानं वजिराला त्या घराचा पत्ता लक्षात ठेवायला सांगितला होता. दुसऱ्या दिवशी बादशहाने आपल्या वजिराला त्या तीन बहिणींना दरबारात हजर करण्याची आज्ञा केली. तिघीही घाबरत दरबारात हजर झाल्या. बादशहाने तिघींनाही अभय दिले आणि म्हणाला, "काल तुमच्या तिघींच्याही इच्छा मी ऐकल्या आहेत. आपल्या इच्छेप्रमाणे आपली लग्ने होतील. तुमच्या आईवडिलांना तसे कळविले आहे. दोन दिवसात तिघींचीही लग्ने झाली. तिसरी बहिण बादशहाची पट्टराणी झाली. तिला ऐटीत मिरवताना पाहून, तिचं ऐश्वर्य पाहून तिच्या दोन बहिणींना मात्र तिचा हेवा वाटू लागला. त्या तिचा मनोमन द्वेष करू लागल्या. काही दिवसातच त्यांना आपली बहिण, बादशहाची पट्टराणी गरोदर असल्याची बातमी समजली. आता त्या तिच्यावर आणखीनच जळू लागल्या. मात्र आपल्याला खूप आनंद झाल्याचे त्यांनी तिला भासविले. त्या तिला जपू लागल्या. तिची काळजी घेण्यासाठी तिच्याजवळ राहू लागल्या. तिसरी बहिण भोळी होती. आपल्या बहिणींचा दुष्ट कावा तिच्या लक्षात आला नाही.


मनोज

योग्य वेळी बादशहाची पट्टराणी प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. परंतु त्या दुष्ट बहिणींनी तिच्या पुढ्यात कुत्र्याचे पिल्लू ठेवून 'तू कुत्र्याच्या पिलालाच जन्म दिलास' असे सांगितले. तिच्या गोंडस मुलाला त्यांनी कपड्यात गुंडाळून एका बांबूच्या करंडीत ठेवले व करंडी जवळच्याच पाण्याच्या प्रवाहात सोडून दिली. पट्टराणीला कुत्र्याचे पिलू झाल्याची आश्चर्यकारक बातमी सर्व राजधानीत तसेच बादशहाच्या कानावर गेली. त्याने ताबडतोब पट्टराणीचा शिरच्छेद करण्याचा हुकूम दिला. परंतु वजिराने राजाची समजूत घातली व पट्टराणीला अभय मिळवून दिले.

दुसऱ्या खेपेलाही पट्टराणी प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. परंतु त्या दुष्ट बहिणींनी तिच्या पुढ्यात मांजराचे पिलू ठेवून तिला मांजराचेच पिलू झाल्याचे भासविले. बिचाऱ्या पट्टराणीने आपल्या कर्मालाच बोल लावून ती मरणालाही तयार झाली. परंतु वजिराने राजाला शांत करून याही वेळी तिला वाचविले. त्या दुष्ट बहिणींनी पहिल्या मुलाप्रमाणेच या मुलालाही पाण्याच्या प्रवाहात सोडून दिले.

योगायोगाने ही दोन्ही मुले राजवाड्यापासून थोड्या दूर अंतरावर राहाणाऱ्या माळ्याला मिळाली. त्यालाही मूलबाळ नव्हते. देवानेच आपल्यासाठी मुले पाठविली असे मानून तो आणि त्याची बायको मुलांचा सांभाळ करू लागली. काही वर्षांनी पट्टराणीला सुंदर, तेजस्वी मुलगी झाली. परंतु त्या दुष्ट बहिणींनी तिलाही पूर्वीच्या मुलांप्रमाणेच पाण्याच्या प्रवाहात सोडून दिले. पट्टराणीच्या पुढ्यात लाकडाचा ठोकळा ठेवून त्या म्हणाल्या, ''तुझं नशीबच खोटं बघ. एवढं पट्टराणीचं पद मिळूनही नशिबात

सुख नाही. यावेळी तर तुला निर्जीव लाकडाचा ठोकळा झालाय. आम्हाला तुझ्याकडे पाहून वाईट वाटतंय पण काय करणार!'' पट्टराणीही धाय मोकलून रडत होती. यावेळी बादशहा आपल्यावर दया दाखविणार नाही हे तिला ठाऊक होते. बादशहाने तिला ठार मारण्याचाच हुकूम दिला. परंतु वजिरामुळे याही वेळी तिच्या प्राणावरचे संकट टळून तिला जन्मभर तुरुंगवासाची शिक्षा झाली. काहीही चूक नसताना बिचारी तुरुंगवास भोगू लागली.

इकडे ती मुलगीही त्याच माळ्याला मिळाली. त्याने मोठ्या मुलाचे नाव बहामन, दुसऱ्या मुलाचे नाव पर्विज व मुलीचे नाव परीजादी असे ठेवले. नक्षत्रासारखी राजबिंडी मुले माळ्याच्या घरात सुखात वाढत होती. मुले जात्याच हुशार असल्यामुळे थोडा पैसा खर्च करून माळ्याने त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था केली. मुलाच्या पायगुणाने माळ्यालाही भरपूर पैसा मिळत होता. आता त्याने स्वत:चे घर बांधले. जमीनजुमला विकत घेतला. घरासमोर छानपैकी बाग तयार केली.

मुले हळूहळू मोठी होत होती. आता ती कामधंदा करू लागली. घोड्यावरून रपेट करू लागली. शिकार करण्यातही तरबेज झाली. एकाएकी एका लहानशा आजारामध्ये माळीण मरण पावली. सहा महिन्यांनी माळीही मरण पावला. मुलांनी त्यांच्या उत्तरक्रिया उत्तम प्रकारे पार पाडल्या. असेच काही दिवस लोटले. एक दिवस परीजादी आपल्या घरात एकटीच असताना एक जोगीण तिच्या दारात आली. परीजादीने तिला अन्नपाणी देऊन संतुष्ट केले. थोडा वेळ विश्रांती घेतल्यावर जोगीण म्हणाली, ''मुली, तुझा वाडा खूप छान आहे. घरासमोरची बाग तर खूपच सुंदर आहे. तरीही तुझ्या या बागेत

बोलणारा पक्षी, गाणारे झाड आणि सोनेरी पाण्याचा हौद असेल तर काय मजा येईल. बादशहालासुद्धा हेवा वाटेल तुझ्या या बागेचा.'' जोगिणीच्या या बोलण्याने परीजादीची उत्सुकता वाढली. तिने जोगिणीला या तीनही वस्तूंचा पत्ता विचारला. जोगीण हसली. या तीनही वस्तूंचे वर्णन तिने परीजादीकडे केले. ती म्हणाली, ''मुली, त्या गाणाऱ्या पक्षाचे नाव 'बुलबुल केझर' असून त्याला बोलता येते, तसेच गाताही येते. तो गाऊ लागला की, इतर पक्षी त्याच्याभोवती जमून त्याला सूर देतात. गाणारे झाड तर खूपच मजेशीर आहे. त्याच्या प्रत्येक पानातून वेगळा सूर उमटतो. वाऱ्याबरोबर हे झाड गाऊ लागते. त्यावेळी आजुबाजूचा परिसर मधुर संगीताने भरून जातो. सोनेरी पाण्याचे सौंदर्य तर अपूर्व आहे. तुझ्या या हौदात त्याचा एक थेंब तू टाकलास तर सर्व हौद सोनेरी पाण्याने भरून जाईल. हौदातल्या कारंजातून सोनेरी पाणी थयथय नाचू लागेल. हौदावर सूर्याची किरणे पडताच त्यातून हजारो रंग उमटतील. खरंच मुली या वस्तू तुझ्याकडे असतील ना तर हजारो लोक तुझ्याकडे हा चमत्कार पाहायला येतील. मात्र या तिन्ही वस्तू बऱ्याच दूर अंतरावर हिंदुस्थानच्या सरहद्दीजवळ आहेत. या वाड्यापासून समोर जाणाऱ्या रस्त्याने एकोणीस दिवस घोड्यावरून प्रवास केल्यानंतर विसाव्या दिवशी प्रथम दिसणाऱ्या माणसाला या तीनही वस्तूंची माहिती विचारावी आणि तो सांगेल तसे करावे. बरं बाई, जाते मी. उशीर झाला.'' परीजादी विचार करीत होती, या वस्तू जर माझ्या बागेत आल्या तर काय मजा येईल. आज तिला खाणेपिणे काहीही सुचत नव्हते. आपल्याच मनोराज्यात ती दंग होती. संध्याकाळी तिचे दोन्ही

भाऊ घरी आले. त्यांना तिने जोगिणीने दिलेली माहिती सांगितली. मोठा भाऊ बहामन म्हणाला, "परीजादी, तुला खरंच हव्यात का या वस्तू? बोल, मी जाऊन आणतो. अग त्यात काय कठीण आहे?" परीजादीला भीती वाटत होती. परंतु दुसऱ्या दिवशी बहामन या वस्तूंच्या शोधार्थ निघाला देखील. जाताना त्याने परीजादीकडे एक चाकू दिला. त्याची पात चांगली धारदार होती आणि पात चांदीसारखी चकचकत होती. तो म्हणाला, "परीजादी, मी सुखरूप असेपर्यंत हा चाकू स्वच्छ राहील. जेव्हा माझ्यावर संकट येईल तेव्हा या चाकूवर तुला रक्ताचे डाग दिसतील. घाबरू नकोस. मी लवकर येतो." बहामन निघून गेला. परीजादी आणि पर्विज रोज सकाळ संध्याकाळ चाकू उघडून पहात. चाकूची पात स्वच्छ असे.

एकोणीस दिवस बहामनने सरळ मार्गाने प्रवास केला. विसाव्या दिवशी त्याला एक म्हातारा फकीर दिसला. घोड्यावरून उतरून त्याने त्याला सलाम केला आणि विचारले, "बाबाजी, मी बोलणारा पक्षी, गाणारे झाड व सोनेरी पाणी यांच्या शोधार्थ निघालो आहे. कृपा करून मला या वस्तूंचा पत्ता सांगा. मी आपला आभारी होईन." बहामनकडे पहात फकीर म्हणाला, "मुला, तू फार कठीण काम अंगावर घेतले आहेस. या वस्तूंजवळ पोहोचणे अवघड आहे. तरीही मी तुला मार्ग सांगतो." आपल्या झोळीतून एक कटोरा काढून त्यानं बहामनला दिला आणि म्हणाला, "मुला, हा कटोरा घेऊन तू घोड्यावर बस. कटोरा पुढे पुढे सरकेल. त्याच्या मागे तू जा. ज्या डोंगराच्या पायथ्याशी हा कटोरा थांबेल तिथं तू थांब आणि घोड्याच्या मानेवर लगाम टाकून डोंगर चढ. डोंगराच्या शिखरावर एका

पिंजऱ्यात तुला हवा तो पक्षी दिसेल. त्यालाच गाणाऱ्या झाडाची आणि सोनेरी पाण्याची माहिती विचार. तो सांगेल. मात्र तो डोंगर चढणे अवघड आहे. कारण डोंगर चढताना तुला अतिशय भयानक आवाज येतील. परंतु तू वैतागून मागे पाहू नकोस. पुढे पहात चालत राहा. जर तू मागे पाहिलेस तर जागच्या जागी दगड होऊन पडशील. तुझा घोडाही दगड होईल.'' फकिराला सलाम ठोकून आणि त्याचे आभार मानून बहामन कटोरा घेऊन घोड्यावर बसला. कटोरा वेगात पुढे सरकत होता आणि त्याच्या मागे बहामन आपला घोडा दौडवीत चालला होता. बरीच घोडदौड केल्यानंतर कटोरा एका डोंगराच्या पायथ्याशी थांबला. बहामन खाली उतरला. त्याने घोड्याच्या मानेवर लगाम टाकला आणि तो डोंगर चढू लागला. थोडा वर जातो न जातो तोच विचित्र आवाज निघायला सुरुवात झाली. न घाबरता तो पुढे चालत होता, परंतु आवाज त्याचा पिछा सोडीत नव्हते. शेवटी तो वैतागला आणि आपली तलवार उपसून त्याने मागे पाहिले मात्र, त्याच क्षणी तो दगड होऊन खाली पडला.

इकडे नेहमीप्रमाणे परीजादीने चाकूचे पाते पाहिले आणि ती दचकली. चाकूच्या पात्यावर रक्ताचे थेंब होते. संध्याकाळी पर्विज घरी येताच ते चाकूचे पाते तिने त्याला दाखविले. बहामनवर संकट आले असल्याचे दोघांनीही ओळखले. परीजादी घाबरून रडू लागली. परंतु पर्विजने तिला समजाविले, ''मी बहामनला संकटातून सोडवीन आणि तुझ्या वस्तूही घेऊन येईन.'' असे म्हणून तो घोड्यावर स्वारदेखील झाला.

एकोणीस दिवस घोडदौड केल्यानंतर विसाव्या दिवशी त्याची

त्या फकिराशी गाठ पडली. फकिराने आपला कटोरा पर्विजकडे देऊन त्याला सर्व माहिती सांगितली. पर्विज कटोऱ्याच्या मागे घोडदौड करीत निघाला आणि त्या डोंगराच्या पायथ्याशी थबकला. कटोरा तिथंच थांबला होता. घोड्याच्या मानेवर लगाम टाकून आजुबाजूला पहात तो डोंगर चढू लागला. परंतु थोड्याच वेळात त्या भयानक आवाजांनी त्याला घेरले. तो वैतागला आणि तलवार उपसून मागे वळला, तोच त्याचे अंग बधीर होत जाऊन तो शिळा होऊन खाली पडला. इकडे परीजादी शंभर मोत्यांचा सर घेऊन त्यांतील मोती पुढे-मागे करीत बसली होती. एकाएकी मोती मागे-पुढे सरकण्याचे बंद झाले आणि परीजादी दचकली. आपल्या दुसऱ्या भावावरही संकट आल्याचे तिने ओळखले. या सर्व गोष्टीला आपण कारण आहोत. आपणच आपल्या भावांना संकटात पाडले. आता त्यांना संकटमुक्त करणे आपले कर्तव्य आहे. रडत बसण्यात काही अर्थ नाही. घराचा सर्व बंदोबस्त करून दुसऱ्या दिवशी प्रवासाला निघण्याचे ठरविले. दुसऱ्या दिवशी तिने आपला घोडा तयार केला. प्रवासात लागणाऱ्या सर्व वस्तू घेतल्या. भावाचे कपडे अंगावर घालून तिने मिशा कोरल्या. कमरेला तलवार लटकावून ती घोड्यावर बसली. आपला घोडा वेगाने दौडवीत ती सरळ मार्गाने निघाली. एकोणीस दिवसाच्या प्रवासानंतर बरोबर विसाव्या दिवशी तिला तो फकीर दिसला. ती घोड्यावरून खाली उतरली आणि फकिराला सलाम ठोकून आपण कशाकरिता आलो आहोत ते तिने त्याला सांगितले. फकीर म्हणाला, ''जी गोष्ट शूर तरुणांना जमली नाही, ती तुला कुठून जमणार! तू तो नाद सोड आणि घरी परत जा. तू मुलगी आहेस हे मी ओळखले

आहे.'' परीजादी म्हणाली, ''बाबा मला पक्षी नको, गाणारे झाड नको, सोनेरी पाणी नको. मला माझे भाऊ हवे आहेत. त्यांना घेतल्याखेरीज मी परत फिरणार नाही.'' परीजादीचा निर्धार पाहून फकिराने आपल्या झोळीतून कटोरा काढून परीजादीकडे दिला आणि मार्गात येणाऱ्या सर्व अडचणी तिला समजावून सांगितल्या. परीजादीने आपल्या कानात बोळे घालून कान व डोळे एका रुमालाने झाकून घेतले आणि ती त्या कटोऱ्यामागे प्रवासाला निघाली. नेहमीप्रमाणे कटोरा डोंगराच्या पायथ्याशी थांबला. परीजादी घोड्यावरून खाली उतरली. तिने घोड्याचा लगाम त्याच्या मानेवर टाकला. देवाचे नाव घेऊन ती डोंगर चढू लागली. थोडे अंतर जाते ना जाते तोच ते भयंकर आवाज तिला सतावू लागले. परंतु कान व डोळे झाकून घेतले असल्यामुळे त्यांची तीव्रता कमी भासत होती. शिवाय तिला आपल्या भावांचा शोध घ्यायचा होता. त्यामुळे मागे बघायचेच नाही असा पक्का निर्धार करूनच ती पुढे चालत होती. अखेर ती डोंगराच्या शिखरावर पोहोचली. एका ठिकाणी तिला पिंजऱ्यात अडकलेला पक्षी दिसला. पक्ष्याजवळ जाईपर्यंत ते भयंकर आवाज तिचा पिच्छा सोडत नव्हते. धीटपणे तिने त्या पिंजऱ्याला हात लावला मात्र, आतील पक्षी आपल्या गोड आवाजात बोलू लागला, ''राजकन्ये, बोल तुला काय पाहिजे?''

''पक्षा, मला माझे भाऊ हवे आहेत. तुझ्या शोधार्थ मी त्यांना पाठवलं होतं. ते इथंच कुठं तरी मरून पडले आहेत. त्यांना घेतल्याखेरीज मी इथून जाणार नाही.'' परीजादी रडू लागली.

"राजकन्ये, रडू नकोस. तुझे भाऊ तुला भेटतील. त्या कोपऱ्यात पाण्याने भरलेले भांडे आहे. ते सोबत घे आणि जाताना त्यातील पाणी प्रत्येक शिळेवर शिंपड, तुझे भाऊ आणि त्यांचे घोडे तसेच इतर तरुणही जिवंत होतील. आणि हो, तुला गाणारे झाड हवे आहे ना, ते पहा समोरच आहे. त्याची फांदी कापून घे आणि ती तुझ्या बागेत लाव. सोनेरी पाण्याचा कुंभही तिथंच आहे. त्यातलं थोडंसं पाणी तुझ्याजवळच्या कुपीत ओतून घे आणि हौदात ओत आणि मला सुद्धा बरोबर घे बरं का!

"आता मी तुझ्याशिवाय जगू शकणार नाही." परीजादी हसली. तिने सर्व वस्तू सोबत घेतल्या आणि ती पक्षाला म्हणाली, "पक्षा, माझ्या सोनुल्या, तू मला राजकन्या म्हणून हाक कशी काय मारतोस. मी आणि माझी भावंडे तर माळ्याची मुले आहोत."

"राजकन्ये ती एक मोठी कहाणी आहे. वेळ येताच मी तुम्हाला सांगेन. चल आपण निघूया. आता आपल्याला इथं जास्त वेळ थांबता येणार नाही." पक्ष्याने आपले पंख फडफडविले. परीजादीने पिंजरा उचलला आणि सर्व वस्तू सोबत घेतल्या. जाताना प्रत्येक शिळेवर ती पाणी शिंपडीत होती. भराभर शिळेतून तरुण बाहेर आले. परीजादीचे डोळे तिच्या भावंडांना शोधीत होते. दु:खी अंत:करणाने ती पुढे पुढे जात होती आणि अचानक एका शिळेतून बहामन बाहेर आला. पर्विजला शोधीत ती सर्व पुढे निघाली आणि वाटेपासून थोड्या बाजूला असलेल्या शिळेवर पाण्याचा शिडकावा करताच पर्विज जागृत झाला. परीजादीचा आनंद गगनात मावत नव्हता.

डोंगराच्या पायथ्याशी येताच तिने त्या भांड्यातलं उरलेलं पाणी तिथल्या शिळांवर शिंपडलं. त्या बरोबर सर्व घोडे जिवंत होऊन आपल्या धन्यांना शोधू लागले. परीजादी आपल्या भावांना घेऊन आपआपल्या घोड्यांवर स्वार झाली. वाटेत त्यांना पूर्वीचा म्हातारा फकीर भेटला. त्याचा आशीर्वाद घेऊन तिघांनीही पुढचा प्रवास सुरू केला. घरी येताच परीजादीने आपले घर साफ केले. पक्षाला गोड रसाळ ताजी फळे खायला दिली आणि तिघांसाठी रुचकर भोजन तयार केले. दोन तीन दिवस विश्रांती घेतल्यानंतर परीजादीने पाण्यात ठेवलेली गाणाऱ्या झाडाची फांदी बागेत लावली. कुपीतले सोनेरी पाणी हौदात ओतले. त्याबरोबर हौद सोनेरी पाण्याने भरून गेला आणि कारंजेही सुरू झाले. परीजादी खूष होऊन बागेत फिरत होती. पक्षाबरोबर बोलत होती. गाणारे झाडही वाढत होते. हळूहळू त्याच्या पानांतून मधुर स्वर उमटू लागले होते.

एकदा बादशहा शिकारीला गेला असता त्याने बहामनला सिंहाशी झुंज खेळताना पाहिले. बादशहा खूष झाला. त्याने बहामनला जवळ बोलावून त्याची चौकशी केली. बहामन म्हणाला, "माझा भाऊ पर्विजदेखील उत्तम शिकारी आहे आणि आमची बहिण परीजादी घोड्यावरून रपेट करण्यात पटाईत आहे. आम्ही तिघेही आपल्या राजवाड्याजवळच्या माळ्याची मुले आहोत." माळ्याची मुले इतकी हुशार म्हणून बादशहाला आश्चर्य वाटले. त्याने पर्विज आणि परीजादी यांनाही पाहाण्याची इच्छा प्रगट केली. बहामनने बादशहाचा आपल्या घरी पाहुणचार करण्याचा दिवस निश्चित केला. घरी येऊन त्याने ती बातमी पर्विज व परीजादी यांना सांगितली. परीजादी बादशहाच्या

पाहुणचाराच्या कामाला लागली. तिची धावपळ आणि गडबड पाहून पिंजऱ्यातल्या पक्षाने तिला जवळ बोलावले. तो म्हणाला, "परीजादी, मला ठाऊक आहे उद्या बादशहा आपल्याकडे येणार आहे. त्याच्यासाठी उत्तम जेवणाची व्यवस्था तू करशीलच. तरीसुद्धा मी सांगतो तो नवा पदार्थ जेवणात करून बादशहाला वाढ. बादशहा काही म्हणाला तर उत्तर मी देईन. उद्या जेवणात भरली वांगी कर. मात्र त्या वांग्यांत मसाल्याबरोबरच तुझ्याजवळ असलेले मोती भर. जा, कामाला लाग." परीजादी कामाला लागली. दुसऱ्या दिवशी बहामन आणि पर्विज बादशहाला घेऊन आपल्या घरी आले. त्यांनी परीजादीची त्याच्याशी ओळख करून दिली. राजकन्येसारख्या दिसणाऱ्या परीजादीला पाहून आणि तिचे मधुर बोलणे ऐकून राजा खूष झाला. त्याने त्यांची बाग पाहिली. बोलणारा पक्षी, गाणारे झाड आणि सोनेरी पाणी पाहून तर तो आपले भानच विसरून गेला. बोलता बोलता जेवणाची वेळ झाली. परीजादीने बादशहा, त्याचे दोन सरदार, आपले दोन्ही भाऊ यांना स्वत:च्या हाताने जेवण वाढले. बादशहा रुचकर भोजनाचा आस्वाद घेत असतानाच त्याने भरल्या वांग्याचा घास घेतला आणि त्याच्या दाताखाली टणक मोती आले.

तोंडातला घास बाहेर काढून राजा पुटपुटला, "जेवणात मोती, आश्चर्यच आहे!"

"वा! बादशहा, जेवणात मोती याचं तुला आश्चर्य वाटलं? कमाल आहे. बरोबर आहे बादशहा. कारण जेवणातला मोती दाताखाली आल्यामुळे तुझा दात दुखावला असणार! स्वत:ला त्रास झाला की तुझ्यासारखे बादशहा विचार करायला लागतात.

दुसऱ्याच्या दुःखाची त्यांना पर्वा नसते. वास्तविक बादशहाने आपल्या प्रजेच्या दुःखाचा विचार करायला हवा. निरपराध व्यक्तीला त्रास होणार नाही याची काळजी घ्यायला हवी. परंतु असं घडत नाही बादशहा!'' पिंजऱ्यातल्या पक्षाचे बोलणे ऐकून बादशहा जेवणावरून उठून पिंजऱ्याजवळ आला. आता बादशहा आपल्या पक्षाला मारणार असं वाटून परीजादी घाबरून गेली. परंतु बादशहाने पिंजऱ्याजवळ येऊन पक्षाला विचारले, ''मतलब?'' पक्षी हसला आणि म्हणाला,

''बादशहा एका स्त्रीला, तुझ्या पट्टराणीला कुत्र्याचे पिल्लू, मांजराचे पिल्लू आणि लाकडाचा ठोकळा होतो याचं आश्चर्य नाही वाटलं तुला? केलीस तू त्याची चौकशी?''

''पण पक्षा, माझ्या पट्टराणीजवळ प्रसुतीच्या वेळी तिच्या लाडक्या आणि प्रेमळ बहिणीच होत्या. त्या कसं खोटं सांगतील? शिवाय कुत्र्याचं पिल्लू, मांजराचं पिल्लू आणि ठोकळा मी स्वतः डोळ्यानं पाहिलाय.'' बादशहा म्हणाला.

''बरोबर! या वस्तूंना जन्म देणारी आपली पट्टराणी दोषी आहे असं मानून तू रागानं तिला शिक्षा दिलीस. पण हे घडेलच कसं याचा विचार तुझ्या मनात नाही आला? राजा, तुझ्या राणीला दोन मुलगे आणि एक मुलगी झाली. परंतु पट्टराणीच्या त्या दुष्ट बहिणींनी हे दुष्ट कारस्थान रचून आपल्या निरपराध बहिणीला तुरुंगात दिवस कंठायला लावले. केवळ ती पट्टराणी झाली याचा दुःस्वास म्हणून. बादशहा, बहामन, पर्विज आणि परीजादी ही तुझी मुले आहेत. त्यांना राजवाड्यावर घेऊन जा आणि त्यांच्या निरपराध मातेला तुरुंगातून सोडवून सन्मानाने आपल्या वाड्यावर ने. जा, आता वेळ घालवू नकोस.'' पक्षी

बोलायचा थांबला. बादशहाला आपल्या कृत्याची लाज वाटली. आपल्या मुलांना बरोबर घेऊन तो तडक त्या जुन्या तुरुंगात गेला. त्याने तिथं दुःखी कष्टी मनाने काम करीत असलेल्या आपल्या पट्टराणीची भेट घेऊन तिची क्षमा मागितली. नंतर त्याने तिला सन्मानाने वाड्यावर आणले. दरबार भरवून त्याने आपले राजपुत्र व राजकन्या कारभारी मंडळींना दाखविली. बादशहाने थोड्याच दिवसात परीजादीचे एका सुंदर राजघराण्यातील तरुणाशी लग्न लावून दिले. माळ्याचे घर आणि ती सुंदर बाग तिलाच देऊन टाकली. त्याच्या बाजूलाच राजकन्येचा सुंदर वाडा तयार झाला. पुढे बादशहाने बहामन व पर्विज यांचेही थाटामाटात विवाह करून दिले आणि राज्याचा कारभार हळूहळू त्यांच्यावर सोपवून बादशहा आपल्या पट्टराणीसह सुखाने राहू लागला.

५

# 'अखेर खोजा हसन हसनशेट झाला...'

सादी आणि साद हे दोघे जिवलग मित्र होते. दोघेही खाऊनपिऊन सुखी होते. दोघांनीही आपले पिढीजात धंदे मुलांवर सोपविले होते. त्यामुळे त्यांना घरची किंवा उद्योगधंद्याची काळजी नव्हती. दोघेही संध्याकाळी फिरायला निघत आणि विविध विषयावर गप्पा मारीत. असेच एके दिवशी ते फिरायला निघाले होते. त्यांच्या गप्पांचा विषय होता, 'माणसाची श्रीमंती.' सादी म्हणाला, "माणसाकडे पैसा असला की त्याच्या साहाय्याने त्याला उद्योगधंदा करून श्रीमंत होता येते."

"हे नेहमीच शक्य नसते. पैसा असला तरी तो वापरण्यासाठी दैवाची साथ लागते. ती लाभली नाही तर पैसा असूनही त्याला तो योग्य ठिकाणी वापरून श्रीमंत होता येत नाही. या उलट दैवाची साथ असेल तर एखादी शुल्लक वस्तूदेखील योगायोगानं माणसाला श्रीमंत बनवते." -साद म्हणाला.

दोघांनाही एकमेकांची मते पटत नव्हती. शेवटी त्यांनी प्रयोग करून आपल्या मतांची सत्यता पटविण्याचे ठरविले. दुसऱ्या दिवशी दोघेही फिरायला निघाले. यावेळी सादीने आपल्याजवळ दोनशे सोन्याच्या मोहरा घेतल्या होत्या. बोलता बोलता ते हसनखोजाच्या घराजवळ आले. हसनखोजा दारातच दोरखंड वळत बसला होता. दोघेही त्याच्या जवळ गेले. सादी म्हणाला,



"हसनमिया, दोरखंडे वळण्याचा धंदा जर तुम्हाला वाढवावयाचा असेल तर जवळ पैसा पाहिजे नाही का!"

"हो ना. पैशाशिवाय काय होतंय. माझ्याजवळ पैसे असते ना तर माझा धंदा देखील वाढवून मला श्रीमंत होता आलं असतं." हसनमिया दोर वळत म्हणाला.

"अहो मग मी देतो तुम्हाला दोनशे मोहरा. वाढवा तुमचा धंदा आणि व्हा श्रीमंत." सादीने दोनशे मोहरांची थैली हसनखोजाच्या हातावर ठेवली. 'परत भेटू' असं म्हणून ते दोघेही निघून गेले. हसनखोजाने घरात जाऊन आपली खोली बंद केली व दोनशे मोहरा मोजून गुपचूप आपल्या पेटीत ठेवल्या. दुसऱ्या दिवशी तो बाजारात निघाला. घरात ठेवलेल्या मोहरा बायकोच्या हाती लागू नयेत म्हणून त्यानी फक्त दहा मोहरा ट्रंकेत ठेवून एकशे नव्वद मोहरा आपल्या पागोट्यात गुंडाळून, पागोटे डोक्यावर ठेवले. बाजारपेठेतून फिरत असता त्याला एक लोण्याचे दुकान दिसले. बरेच लोक लोणी घेत होते. लोणी संपायला आले होते. आपणही लोणी घेऊ आणि नंतर दोरखंडे विणण्याचे सामान खरेदी करू असं ठरवून त्याने लोणी घेतले. हातात लोण्याची पुरचुंडी घेऊन तो बाहेर आला. मात्र एका घारीनं त्याच्या हातावर झडप घातली. हसनमियाने हातातली पुडी घट्ट पकडली. परंतु त्या झटापटीत घार आपल्या पायात हसनमियाचे पागोटे घेऊन उंच उडाली. हसनमिया आणि इतर माणसे घारीच्या मागे लागली. परंतु ती हाती लागली नाही. घरी येऊन हसनमियाने कपाळावर हात मारला. आता त्या दहा मोहरात धंदा वाढविणे शक्यच नव्हते. आपल्या नशिबाला बोल लावून तो आपल्या नेहमीच्या कामाला लागला

सहा महिन्यांनतर सादी आणि साद पुन्हा हसनखोजाच्या घराजवळ आले. पहातात तो हसनखोजा नेहमीप्रमाणे दोरखंड वळत बसलेला. त्याच्या जवळ बसत सादी म्हणाला, "काय हसनमिया, आमच्या मोहरांचा काही उपयोग झाला की नाही ? तुझा धंदा तर आहे तसाच आहे!" कपाळावर हात मारीत हसनखोजी म्हणाला, "कसं सांगू तुम्हाला माझं नशिबच खोटं. तुमच्या मोहरांचा उपयोग मी धंद्यासाठी करूच शकलो नाही हो!" हसनखोजानं सर्व हकिगत त्यांना सांगितली. सादने हळूच सादीकडे पाहिले, परंतु तेवढ्यात सादी म्हणाला, "आणखी एक वेळ मी तुला तुझ्या धंद्याकरिता दोनशे मोहरा देतो. तुझा धंदा वाढलेला आणि तू खूप खूप श्रीमंत झालेला बघायचं आहे आम्हाला! चल, या घे दोनशे मोहरा आणि लाग बघू कामाला!" हसनखोजानं दोनशे मोहरा घेऊन सादी व साद दोघांचेही आभार मानले. यावेळी त्याने पक्कं ठरवलं, बाजारात सामान आणायला जाताना फक्त दहाच मोहरा न्यायच्या आणि थोडं थोडं सामान आणायचं. शिवाय मोहरा पागोट्यात न ठेवता त्या कमरेलाच बांधून ठेवायच्या. आपली बायको उधळी आहे. तिला आपल्याकडे मोहरा आहेत हे समजलं, तर ती त्या गोड गोड बोलून आपल्याकडून काढून घेईल. म्हणून तिला समजणार नाही आणि तिच्या हाती लागणार नाहीत अशाच जागी मोहरा गुपचूप ठेवून द्यायच्या. मोहरा ठेवण्यासाठी तो जागा शोधू लागला. घरामध्येच एका अडगळीच्या खोलीत एक मातीचे रांजण होते. रांजणाचे तोंडही फुटलेले होते. रंगही चांगलाच विटला होता. रांजणात कोंडा भरलेला होता. या रांजणात अगदी तळाला मोहरांची पुरचुंडी ठेवली तर कुणालाही

समजणार नाही असा विचार करून तो कामाला लागला. प्रथम त्याने दहा मोहरा काढून घेतल्या आणि एकशे नव्वद मोहरा एका रुमालात गुंडाळून ती पुरचुंडी रांजणात ठेवून दिली.

दुसऱ्या दिवशी दहा मोहरा कमरेला बांधून तो बाजारात जाण्यासाठी तयार झाला. 'बाजारातून दोर वळण्यासाठी सामान घेऊन येतो' असं बायकोला सांगून तो बाहेर पडला. इतक्यात एक साबण विकणारा फेरीवाला मोठमोठ्याने ओरडत ओरडत हसनखोजाच्या घराजवळून जात असलेला हसनखोजाच्या बायकोने पाहिला. तिच्या घरातला साबण संपला होता. तिनं फेरीवाल्याला हाक मारली. फेरीवाल्याकडील साबण तिला आवडला. परंतु तो विकत घ्यायला तिच्याकडे पुरेसे पैसे नव्हते. लगेच तिला अडगळीत पडलेल्या कोंड्यानं भरलेल्या रांजणाची आठवण झाली. धावत जाऊन तिनं रांजण बाहेर आणले आणि फेरीवाल्याला रांजण दाखवून ती म्हणाली, "बाबा, या रांजणात कोंडा आहे. तो या रांजणासहीत देईन. यावर साबण देणार असशील तर घेते. बोल, देतोस?"

फेरीवाल्याने रांजण पाहिले. रांजण कोंड्याने भरले होते. घरातल्या कोंबड्यांना कोंडा कालवून खायला घालता येईल असा विचार करून त्याने आपल्या टोपलीतून साबणाच्या पाच सहा वड्या काढून तिच्या हातावर ठेवल्या आणि रांजण आपल्या टोपलीत ठेवून तो निघून गेला.

बऱ्याच वेळानंतर हसनखोजा घरी आला. आज त्याने दोरखंड वळण्यासाठी लागणारा ताग एका चांगल्या दुकानात पाहून सौदाही ठरविला. पैसे घेऊन येतो असे दुकानदाराला सांगून तो घरी आला होता. बायको जेवण करण्यात गुंतली होती.

तो तडक अडगळीच्या खोलीत गेला. पहातो तो तिथं कोंड्याचं रांजणाच जागेवर नाही. तो घाबरला. बायकोला हाक मारून त्याने चौकशी केली. जेवण करता करताच बायको म्हणाली, ''अहो, कशाला हवंय तुम्हाला रांजण? फुटलं तर होतं. अडगळीत पडून काय मेला त्याचा उपयोग? नुसती अडचण. मी साबण घेतला त्यावर. छान वड्या दिल्या फेरीवाल्यानं. आता आठ पंधरा दिवस तरी साबण पुरेल तो.'' बायकोचे शब्द ऐकून हसनखोजा कपाळावर हात मारून खालीच बसला. त्याने बायकोबरोबर बराच वेळ भांडण केले. त्या डेऱ्यात मोहरा होत्या हे ऐकून हसनखोजाची बायकोही रडू लागली.

''मोहरा माझ्याकडे न देता त्या रांजणात मला न सांगता का ठेवल्यात?'' तिने रडत रडत हसनखोजाला विचारले. शेवटी दोघेही त्या फेरीवाल्याच्या मागे धावले. परंतु बराच वेळ शोधूनही तो सापडला नाही. शेवटी आपल्या नशिबालाच बोल लावून हसनखोजा पुन्हा आपल्या कामाला लागला. असेच सहा महिने उलटून गेले आणि पुन्हा एक वेळ सादी आणि साद यांची जोडी हसनखोजाच्या घराजवळ आली. हसनखोजा पूर्वीप्रमाणेच खाली मान घालून आपल्या घरासमोर काम करीत बसला होता. त्याच्या पाठीवर थाप मारून सादी म्हणाला, ''हसनमिया, बोल. कसा चाललाय तुझा धंदा?'' सादीचे शब्द ऐकून हसनखोजाला स्वत:ला रडूच येईल असे वाटू लागले. स्वत:च्या कपाळावर हात मारून तो म्हणाला, ''भाई, माझ्या नशिबातच नाही तिथं तुम्ही तरी काय करणार! जाऊ द्या. पण तुम्ही माझ्या कल्याणाचा विचार करून मला जी मदत दिलीत त्याबद्दल मात्र मी आपला आभारी आहे.'' हसनखोजानं सर्व हकिगत

सादी व साद यांना सांगितली. ती ऐकून साद म्हणाला, ''पाहिलंस सादी, धंद्यासाठी केवळ पैसा देऊन त्या जोरावर एखाद्या व्यक्तीला आपला धंदा वाढवून श्रीमंत होता येत नाही. तर तो पैसा वापरण्यासाठी दैवाचीही साथ लागते. हसनखोजाला ती लाभलेली नाही. म्हणून हे असं घडलं.'' ''अगदी बरोबर. मला पटलं तुझं म्हणणं. परंतु एखादी शुल्लक वस्तूदेखील दैवाची साथ मिळाली तर माणसाला श्रीमंत बनवते असं तूच म्हणतोस, मग कर बघू तसा एखादा प्रयत्न.'' सादी म्हणाला. सादने आपल्या आजुबाजूला हसनखोजाला देण्यासाठी एखादी वस्तू दिसते का ते पाहिले. अगदी त्याच्या पायाजवळच एक जाळे विणण्याची सुई पडली होती. सादने ती सुई उचलून हातात घेतली. तो सादीला म्हणाला, ''सादी, ही सुई मासे पकडणाऱ्या कोळ्याला त्याचं जाळं विणायला उपयोगी पडते. हसनखोजी तर दोरखंडे वळण्याचे काम करतो. त्याला या सुईचा काडीइतकाही उपयोग नाही. तरीही ही सुई मी त्याला देणार आहे. पाहूया या सुईमुळे हसनखोजाचं दैव उघडून तो श्रीमंत होतो का!'' लागलीच त्यानं ती सुई हसनखोजाच्या हातावर ठेवली आणि म्हणाला, ''हसनमिया, यावेळी मी तुला ही एक छोटीशी भेट देत आहे. ठेव तुझ्याजवळ.'' दोघेही निघून गेले. हसनखोजानं सुई उलट सुलट करून पाहिली आणि आपल्याला तिचा काहीही उपयोग नाही असं स्वत:शीच पुटपुटत ती खिशात ठेवून दिली.

आपलं काम आटोपून बऱ्याच उशिरा हसनखोजी आपल्या घरात गेला. अंगरखा काढून त्यानं खुंटीला लावला. जेवण वगैरे झाल्यानंतर झोपायच्या तयारीत असतानाच कुणीतरी त्याचा

दरवाजा वाजविला. बायकोने दरवाजा उघडला. पहाते तो दारात शेजारच्या कोळ्याची बायको उभी. म्हणाली, "आमच्या मुलानं जाळं विणण्याची सुई खेळायला घेतली आणि कुठंतरी टाकून दिली. खूप शोधली पण सापडत नाही. दुकानंही सगळी बंद झाली. आमचं जाळं दोन तीन ठिकाणी फाटलंय. ते शिवल्याशिवाय त्यात मासे सापडणार नाहीत. तुमच्याकडे आहे का एखादी सुई ?" खोजाच्या बायकोने मान हलविली. इतक्यात हसनखोजी सुई घेऊन बाहेर आला. कोळ्याच्या बायकोला सुई दाखवित तो म्हणाला, "ही का तुमची सुई ? आमच्या दारात पडली होती. माझ्या मित्राला मिळाली. त्यानी मला दिली." सुई पाहून कोळ्याच्या बायकोला आनंद झाला. "माझं मोठ्ठं काम केलंत तुम्ही. उद्या पहिल्या खेपेस जाळ्यात जेवढे मासे मिळतील तेवढे तुमचे." असं म्हणून सुई घेऊन ती घाईघाईनं निघून गेली. कोळ्यानं आपलं फाटलेलं जाळं दुरुस्त केलं. दुसऱ्या दिवशी तो मासे पकडण्यासाठी गेला. पहिल्याच खेपेस त्याच्या जाळ्यात एक अडीच हात लांब व दीड हात रुंद असा एकच मासा सापडला. नंतर त्याला लहान लहान बरेच मासे मिळाले. आपल्या वचनाप्रमाणे कोळ्याच्या बायकोने तो मोठा मासा हसनमियाला देऊन टाकला. हसनमियाच्या बायकोने तो मासा चिरला. पहाते तो आत काचेचा तुकडा. तिनं तो बाहेर काढला. काचेचा तुकडा प्रकाशात चांगलाच चमकत होता. तो उलटसुलट करून ती त्याचं निरीक्षण करू लागली. इतक्यात तिची दोन मुले तिथं धावत आली. त्यांनी तो काचेचा तुकडा पाहिला. एकाने त्या तुकड्यावर झडप घालून तो घेऊन तो बाहेर पळाला. दुसरा त्याच्या मागे धावला. खोजाची बायको

आपल्या कामात गुंतून गेली. संध्याकाळी शेजारच्या घरात राहणाऱ्या श्रीमंत हिऱ्याच्या व्यापाऱ्याची बायको खोजाच्या बायकोकडे आली आणि म्हणाली, "अहो, दुपारी तुमची मुलं कुठल्या तरी काचेच्या तुकड्याबरोबर खेळत होती. खूप चमकतो म्हणे तो काचेचा तुकडा. माझा मुलगा तसाच काचेचा तुकडा हवा म्हणून हट्ट घेऊन बसलाय. जरा दाखवता का तो तुकडा कसा आहे तो, म्हणजे मी त्याला तसाच दुसरा विकत आणून देईन." खोजाच्या बायकोने मुलाकडून तो काचेचा तुकडा घेऊन हिऱ्याच्या व्यापाऱ्याच्या बायकोला दाखवला. काचेचा तुकडा पाहून हिऱ्याच्या व्यापाऱ्याच्या बायकोचे डोळे चमकले. ही काच नसून हिरा आहे हे तिने लगेच ओळखले. "थांबा हं, मी ही काच माझ्या नवऱ्याला दाखवून लगेच परत आणते. म्हणजे ते माझ्या मुलाला अशीच काच विकत आणून देतील." खोजाची बायको काही बोलणार इतक्यात ती काच घेऊन घरी गेली देखील.

थोड्याच वेळात हिऱ्याचा व्यापारी आणि त्याची बायको दोघेही खोजा हसनच्या दारात हजर झाले. हिऱ्याचा व्यापारी म्हणाला, "हसनभाई, मी तुला शंभर मोहरा देतो. तुझ्या धंद्याला कामी येतील. हा काचेचा तुकडा माझ्या मुलासाठी दे. दुकानदाराला पैसे देईन ते तुला देतो काय?" व्यापाऱ्याचे शब्द ऐकून खोजा हसनला थोडा संशय आला. कदाचित आपल्याला माशाच्या पोटात सापडलेली काच, काच नसून हिराच असेल! छे छे! मला नाही विकायची ती काच!" तो जोरात ओरडला आणि त्यानी तो काचेचा तुकडा आपल्या हातात घेतला. परंतु ती नवरा बायको जागची हलेनात. त्या

काचेच्या तुकड्याची किंमत चढवीत चढवीत त्यांनी पाचशे मोहरापर्यंत नेली. आता मात्र खोजा हसनची खात्री झाली की, आपल्या हाती असलेली काच नक्कीच हिरा आहे. शेवटी व्यापारी एक हजार मोहरा द्यायला तयार झाला. तेव्हा खोजा हसन म्हणाला, ''भाई, जर ही काच तुम्हाला हवीच असेल तर तुम्हाला म्हणून एक लक्ष मोहरांना देईन. नाहीतर या काचेच्या तुकड्याचे मला दोन लक्ष रुपये मिळतील. आहे कबूल? तेव्हा घरी जाऊन विचार करा आणि पैसे घेऊन या.''

हिऱ्याच्या व्यापाऱ्याने क्षणभर विचार केला आणि तो बायकोला घेऊन घरी गेला. खोजा हसननं आपल्या घराचा दरवाजा लावून घेतला. परंतु खोजा हसनची बायको त्याच्याशी भांडू लागली. ''अहो एक हजार मोहरा मिळत होत्या त्या घ्यायच्या. नाही तरी कोण घेणार आहे हा काचेचा तुकडा! घरी चालत आलेली दौलत घालवलीत तुम्ही.'' तिच्या बोलण्यावर मोठ्यानं हसत खोजा हसन म्हणाला, ''अग ही काच नाही. हिरा आहे हिरा. तो व्यापारी आता येईल बघ पैसे घेऊन.'' थोडा वेळ जातो ना जातो तोच खोजा हसनचा दरवाजा पुन्हा ठोठावला गेला. खोजा हसननं दरवाजा उघडला. पहातो तो हिऱ्याचा व्यापारी हातात मोहरांची थैली घेऊन उभा. घरात येऊन बसत तो म्हणाला, ''हसनभाई, मोजा या मोहरा. एक लक्ष आहेत आणि द्या तो काचेचा तुकडा.''

''हं हं. काचेचा तुकडा नाही भाई, हिरा! हिरा बोल.'' खोजा हसन, त्याची बायको आणि मुले मोहरा मोजायला बसली. मोहरा मोजायला बराच वेळ लागला. परंतु त्या बरोबर एक लक्ष होत्या. खोजा हसननं काचेचा तुकडा व्यापाऱ्याच्या

हातावर ठेवून त्याला आनंदानं मिठी मारली. थोड्या वेळानं व्यापारी निघून गेला. आज खोजा हसनच्या घरात आनंदी आनंद होता.

दुसऱ्या दिवशी खोजा हसननं बाजारातून दोरखंडे वळण्यासाठी बराच कच्चा माला आणला आणि आपला धंदा वाढविला. त्याला गिऱ्हाईकही चांगले मिळाले. हळूहळू त्यानी आपल्या हाताखाली दोन कारागिर ठेवले. दोरखंडे भराभर वळली जातील अशी यंत्रेही त्याने खरेदी केली. काही दिवसांनी गावातील एक दोरखंडाचा कारखानाच त्याने खरेदी केला. काही महिन्यांनी त्यानी आणखीही दोन कारखाने आपल्या हातात घेतले. कामासाठी बरेच मजूर त्याने कारखान्यात लावले. मात्र त्याने कुणावरही अन्याय केला नाही. मजुरांना त्यांचा मोबदला वेळेवर व भरपूर देवून तो त्यांना खूष ठेवीत होता. मजूरही त्याच्यावर खूष होते. आता त्याने चांगले मोठे घर खरेदी केले. गावातील दोन सुंदर बगिचेही त्याने विकत घेतले. जमीनजुमलाही खरेदी केला. हळूहळू त्याची प्रतिष्ठा वाढत गेली. एक वर्षात लोक त्याला 'खोजा हसन अलहावल' म्हणजे 'हसनशेट दोरबंदवाले' म्हणून ओळखू लागले.

एक वर्ष उलटून गेल्यानंतर एक दिवस सादी आणि साद फिरत फिरत खोजा हसनला पहाण्यासाठी त्याच्या जुन्या जागेवर आले. परंतु तिथं त्यांना ख़ोजा हसन दिसला नाही. त्यांनी त्याची चौकशी केली. तेव्हा तिथल्या लोकांनी हसनशेटच्या वाड्याचा पत्ता सांगितला. सादी आणि साद त्याच्या वाड्यात हजर झाले. नोकरांनी हसनशेटला बाहेर बोलाविले. सादी सादला पाहून खोजा हसनला खूपच आनंद झाला. त्याने आनंदाने

दोघांनाही मिठी मारली. त्यांना आपल्या वाड्यातल्या उच्च मंचकावर बसवून त्यांचा आदरसत्कार केला. एका लहानशा जाळे विणण्याच्या सुईने आपल्याला थोड्याच काळात श्रीमंत कसे बनविले याची हकिगत त्याने दोघांना सांगितली. सादी आणि साद आश्चर्याने एकमेकांच्या तोंडाकडे पहात होते.

"आता तुम्ही दोघांनी माझ्याकडे आठ दिवस राहून माझ्या घरचा पाहुणचार घेतला पाहिजे. मी तुम्हाला माझे कारखाने, बगिचे, जमीनजुमला सर्व दाखवीन तेव्हाच मला बरे वाटेल. आपण नाही म्हणू नका. अहो, ही सर्व आपलीच मेहरबानी आहे. मी तुम्हाला कधीही विसरू शकत नाही." खोजा हसनच्या डोळ्यात पाणी तरारले. त्याच्या बायकोने आणि मुलांनीही सादी सादला आपल्या वाड्यावर आठ दिवस राहाण्याचा आग्रह केला. सादी सादलाही खोजा हसनचे वैभव पाहण्याची इच्छा होती. त्यांनी खोजा हसनकडे आठ दिवस राहण्याचे मान्य केले. खोजा हसनने त्यांना आपले कारखाने दाखविले. कारखान्यांतील कामकाज कसे चालते ते समजावून सांगितले. एक दिवस तो त्या दोघांना घेऊन आपल्या बगिच्यांतील बंगल्यात गेला. बगिच्यातून फिरत असता आणखी एक चमत्कार घडला. एका झाडावर एका पक्ष्याचे घरटे होते. त्या घरट्याभोवती लाल कपड्याचे आवरण दिसत होते. त्या कपड्याचे एक टोक खाली आलेले असून वाऱ्याबरोबर हलत होते. सादी सादने आश्चर्याने त्या घरट्याकडे पाहिले. खोजा हसनचेही लक्ष त्या चमत्कारिक घरट्यांकडे गेले. लगेच त्याने आपल्या एका नोकराला बोलावून घरटे खाली काढले. पक्ष्याने पागोट्यात घरटे बनविले होते. घरट्यात पक्षी नव्हते. दोन अंडी मात्र दिसत होती. खोजा हसनने आपले जुने पागोटे ओळखले. ते काढून झटकताच त्यातून एकशे नव्वद मोहरांची पुरचुंडी खाली पडली. सर्वांनाच

आश्चर्याचा धक्का बसला. सादीच्या खांद्यावर थोपटीत साद म्हणाला, ''पाहिलंस, दैवाची साथ असली की हे सगळं घडतं!'' सादी साद खोजा हसनच्या बगिच्यात दोन दिवस आरामात राहिले. तिसऱ्या दिवशी तिघेही गप्पा मारीत बसले असता एक नोकर धावत धावत खोजा हसनकडे आला. हातातली पुरचुंडी त्याच्या हातात देत तो म्हणाला, ''शेट, ही पुरचुंडी मला कोंड्याच्या डेऱ्यात सापडली. कालच मी एका व्यापाऱ्याकडून गुरांसाठी कोंडा खरेदी केला. व्यापारी म्हणाला, कोंड्याचा डेराच घेऊन जा. मी घेऊन आलो. परंतु घरी येऊन पाहतो तो आतला कोंडा खराब झालेला. म्हणून मी तो जमिनीवर ओतला. पाहतो तो आत ही पुरचुंडी सापडली. पहा बरं कसली आहे ती!'' खोजा हसननं पुरचुंडी लगेच ओळखली. ''म्हणजे हरवलेल्या आणखी एकशे नव्वद मोहरा सापडल्या तर!'' तो मोठ्यानं ओरडला. सादी सादला आणखी एक आश्चर्याचा धक्का बसला. सादीच्या हातावर टाळी मारून साद म्हणाला, ''पाहिलंस, दैवाची साथ असली ना की हे असं सगळं घडत जातं.'' सादीनं सादचं म्हणणं एकदम मान्य केलं. ''पैशाच्या जोरावरच आपला धंदा वाढवून श्रीमंत होता येतं असं नाही. तर तो पैसा वापरण्यासाठी दैवही अनुकूल असावं लागतं. ज्यावेळी दैव अनुकूल असेल त्यावेळी एखादी क्षुल्लक वस्तू देखील माणसाची भरभराट करू शकते. पटलं बुवा आपल्याला!'' सादी म्हणाला.

दोघांनीही आणखी दोन दिवस खोजा हसनकडे पाहुणचार घेतला आणि खोजा हसनला अनेक शुभेच्छा व्यक्त करून ते आपल्या घरी परतले.

# ६ विनोदी जोडपे - अबूलहसन आणि नुझातूल

बगदाद शहराचा कलीफा 'हारून अलरशिद' याच्या पदरी 'अबूलहसन' नावाचा एक खुशमस्कऱ्या होता. आपल्या विनोदी बोलण्यातून आणि विनोदी कृत्यांतून तो कलीफाची उत्तम करमणूक करीत असे. कलीफालाही त्याच्या सान्निध्यात थोडा वेळ घालवायला आवडत असे. आपली सर्व दुःखे व चिंता कलीफा त्या काळात विसरून जात असे. दरबारातल्या कामामुळे त्याच्या डोक्याला आलेला शीण अबूलहसनच्या संगतीत नाहीसा होई. अबूलहसनने आपल्याला असेच हसवीत राहावे असे त्याला वाटे. बऱ्याच वेळा तो अबूलहसनला घेऊन जुबैदी राणीच्या महालात जाई. अबूलहसनच्या विनोदी बोलण्याने जुबैदी राणीचीही करमणूक होई. तिच्या इतर दासीही त्याच्यावर खूष होत्या. त्यापैकी नुझातूल दासीचे तर त्याच्यावर प्रेमच जडले. जुबैदी राणीच्या ही गोष्ट लक्षात येताच तिने कलीफाला सांगून अबूलहसन आणि नुझातूलचे लग्नच लावून दिले. कलीफाने त्यांना राहायला चांगला वाडा आणि चैन करण्यासाठी सोन्याच्या मोहराही दिल्या. दोघेही त्या वाड्यात अनेक दिवस. सुखात राहिले. परंतु हळूहळू जवळचा पैसा संपत आला. आता पुढे काय, असा विचार दोघांनाही पडला. आता कलीफाकडे काहीतरी नोकरी करणे भाग होते. परंतु त्यापूर्वी कलीफाची भेट अगदी विनोदी पद्धतीनं घेऊन त्याच्याकडून थोड्या मोहरा

उकळायच्या असे दोघांनीही ठरविले. विचार करता करता त्यांना एक युक्ती सुचली. अबूलहसन घरी मेल्याचे सोंग घेऊन पडून राहिला आणि नुझातूला मोठमोठ्यानं रडत, छाती बडवीत राणी जुबैदीच्या महालात आली. जमिनीवर अंग टाकून तिनं हंबरडा फोडला. कपाळ बडवून घेतले आणि रडत रडत ती म्हणाली, "राणीसाहेब, माझं कपाळ फुटलं हो! राणीसाहेब, माझं भाग्य संपलं हो, माझा पती देवाघरी गेला हो! आता मी काय करू?" अबूलहसन मेल्याचे ऐकून राणीला अतिशय वाईट वाटले. तीही रडू लागली. नंतर तिने नुझातूलचे सांत्वन केले. तिला तिचा सांभाळ करण्याचे आश्वासन दिले. आपल्या जवळच्या एक हजार मोहरा आणि उंची वस्त्रे तिला देऊन ती म्हणाली,

"जा नुझातूल, अबूलहसनची उत्तरक्रिया उरक. तुझी नातेवाईक मंडळी आहेत ना तुझ्या सोबत?"

नुझातूलाने मान हलविली आणि घुंघट ओढून ती आपल्या वाड्याकडे धावली. आपली करामत कशी यशस्वी झाली ते तिने अबूलहसनला सांगितले. एक हजार मोहरा आणि उंची वस्त्रे अबूलहसनच्या हातात देत ती म्हणाली, "आहे का नाही मी तुमच्यापेक्षा सवाई?"

"अग, पण आता तुला मरायला हवे. बस अगोदर खाली. घे मरणाचं सोंग. आता मी जातो कलीफाकडं लवकर. कलीफा महालात जाण्यापूर्वी जायला हवं." अबूलहसननं नुझातूलला खाली झोपवलं. तिच्या अंगावर वस्त्र अंथरलं आणि तो धावत कलीफाच्या दरबारात आला. दरबारातील कामे उरकून कलीफा वजिराबरोबर कसलंतरी खलबत करीत बसला होता. अबूलहसन मोठमोठ्यानं रडत ओरडत त्याच्याजवळ गेला आणि त्याच्या



पायाशी बसत कपाळावर हात मारून म्हणाला,

"महाराज, महाराज माझी नुझातूल मेली हो! अचानक मेली. छातीत कळ आली तिच्या. आता मी काय करू हो... माझ्यावर दु:खाचा डोंगर कोसळलाय." कलीफाने चमकून अबूलहसनकडे पाहिलं. खरोखरच अबूलहसन डोळ्यातून आसवे गाळीत होता. त्याचे डोळे रडून रडून लाल झाले होते. कलीफाने अबूलहसनची आस्थेनं चौकशी केली. त्याच्याकडून सर्व हकिगत समजावून घेतली. शेवटी त्याचे सांत्वन करून त्याने त्याच्या हातावर एक हजार मोहरा आणि उंची वस्त्रे ठेवली. आपल्या नातेवाईकांच्या मदतीने नुझातूलाचा अंत्यविधी नीट उरक असे बजावून त्याने त्याला वाटेला लावले आणि ही बातमी जुबैदी राणीला सांगायसाठी तो तिच्या महालात आला. पहातो तर राणी जुबैदी पलंगावर बसून हुंदके देत होती आणि इतर दासी तिला समजावता समजावता स्वत:च रडत होत्या. कलीफा येताच त्या दूर निघून गेल्या. कलीफा जुबैदी राणीच्या पलंगावर बसला आणि स्वत:च रडू लागला. थोड्या वेळानं स्वत:चे अश्रू आवरून तो म्हणाला,

"जुबैदी, तुझी आवडती दासी नुझातूला देवाघरी गेली. आपला अबूलहसन बिचारा दु:खी झाला." कलीफाच्या तोंडची वाक्ये ऐकून जुबैदी राणी पलंगावर सावरून बसली आणि म्हणाली, "महाराज, तुम्हाला कुणीतरी चुकीची बातमी दिली. अबूलहसन देवाघरी गेला. अबूलहसन मेला. बिचाऱ्या नुझातूलाचं नशिबच खोटं. आता काय करील बिचारी?"

राणी जुबैदीला मध्येच अडवीत कलीफा म्हणाला, "तू कसली बडबड करतेस. आत्ता नुकताच अबूलहसन माझ्याकडे

रडत आला होता. त्यानेच मला नुझातूला छातीत कळ येऊन मेल्याचं सांगितलं.''

''अहो पण आत्ता नुकतीच नुझातूला प्रत्यक्ष माझ्याकडे आली होती. तिनंच आपलं कपाळ बडवीत अबूलहसन मरण पावल्याचं सांगितलं. माझ्या दासीदेखील साक्षीदार आहेत.'' दोघेही विचारात पडले, नक्की कोण मेलं. कलीफा आपले म्हणणे खरे म्हणत होता तर जुबैदीराणी आपले म्हणणे खरे आहे असे म्हणत होती. शेवटी दोघांनी पैज लावली. नुझातूला मेली असेल तर जुबैदी राणीने आपला आरसे महाल कलीफाला द्यायचा आणि अबूलहसन मेला असेल तर कलीफाने आपली सुंदर बाग जुबैदी राणीला द्यायची. अगोदर कलीफाने आपला एक नोकर अबूलहसनच्या वाड्यात पाठविला. नोकर वाड्याकडे येताना पाहून नुझातूला मेल्याचे सोंग घेऊन झोपली. तिच्या अंगावर कलीफाने दिलेली उंची वस्त्र टाकून अबूलहसन शोक करीत बसला. नोकर येऊन पाहतो तो नुझातूला मेलेली. तो थोडा वेळ अबूलहसनजवळ थांबून परत फिरला. अबूलहसनने थोड्या वेळाकरिता काही स्त्री पुरुष तिथं शोक करीत बसविले होतेच. त्यामुळे नोकराला नुझातूला मेल्याचेच खरे वाटून त्याने सर्व हकिगत कलीफाला सांगितली. परंतु राणी जुबैदी त्याचे म्हणणे खरे मानीना. तिने आपली खास दाई अबूलहसनच्या वाड्यात पाठविली. अबूलहसनने जुबैदी राणीची दाई वाड्याकडे येताना पाहिली आणि तो मेल्याचे सोंग घेऊन खाली झोपला. नुझातूलाने त्याच्या अंगावर उंची वस्त्र परसली आणि ती आपला उर बडवून घेत रडू लागली. मघाची माणसेही खोटं खोटं रडत बसली. दाई आत आली. पहाते तो खरोखरच अबूलहसन

मरून पडलेला. ती थोडा वेळ तिथं थांबली. तिने नुझातूलाचे सांत्वन केले आणि ती राणीच्या महालाकडे परत फिरली. खरोखरीच अबूलहसन मेला असल्याची बातमी तिनं राणीला सांगितली. आता मात्र कलीफा आणि राणी जुबैदी विचारात पडले. दोघांनीही अबूलहसनच्या वाड्यावर प्रत्यक्ष जाऊन प्रेतयात्रेतच भाग घ्यायचे ठरविले. अबूलहसनला पक्के माहीत होते की आता कलीफा आणि राणी जुबैदी दोघेही वाड्यावर येणार. त्यानं सर्व तयारी केली. आता दोघेही मेल्याचे सोंग घेऊन खाली झोपले. त्यांच्या इतर माणसांनी त्यांच्या अंगावर उंची वस्त्रे अंथरली आणि ती सर्व त्या दोघांभोवती शोक करीत बसली. थोड्याच वेळात कलीफा आणि राणी जुबैदी लवाजम्यासह अबूलहसनच्या वाड्याकडे निघाले. वाड्याचा दरवाजा उघडाच होता. कलीफा आत येताच सर्व मंडळी उठून बाजूला गेली. अबूलहसन आणि नुझातूला दोघेही मरून पडलेली पाहून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. अबूलहसनच्या अंगावरून हात फिरवीत कलीफा म्हणाला, ''बिचारा अबूलहसन नुझातूलाच्या मृत्यूच्या शोकानं मेला.'' ''नाही हो, माझी ही नुझातूला अबूलहसनच्या शोकानं मेली बिचारी.'' जुबैदी राणी मोठमोठ्यानं रडू लागली. तिला शांत करीत कलीफा म्हणाला, ''अगोदर आपल्याला या दोघांपैकी प्रथम कोण मेलं याचा शोध घ्यायला हवा.'' त्यानी सर्व मंडळींना जवळ बोलावले आणि म्हणाला, ''हे पहा, ही दोघं इथं मरून पडली आहेत याचं दु:ख आम्हाला आहेच, परंतु या दोघांपैकी प्रथम कोण मेलं यावर आमची राणी जुबैदीबरोबर पैज लागली आहे. तेव्हा ते प्रथम शोधून काढणे महत्त्वाचे आहे. तेव्हा प्रथम कोण

मेला हे जो नक्की सांगेल त्याला एक हजार मोहरा बक्षीस दिल्या जातील.'' सर्व मंडळी एकमेकांच्या तोंडाकडे पहात राहिली. इतक्यात उंची वस्त्राखालून आवाज आला,

''महाराज, प्रथम मी मेलो. द्या मला एक हजार मोहरा.'' कलीफाने चमकून अबूलहसनच्या प्रेताकडे पाहिले. डोळे मिचकावीत अबूलहसन उठून बसला. त्याने कलीफाचे पाय धरून क्षमा मागितली आणि एक हजार मोहरांसाठी हातही पुढे केला. नुझातूलाही उठून बसली. तिने राणीचे पाय धरले. ''म्हणजे तुम्ही दोघेही मेले नाहीत तर...! अरे मग हा सगळा खटाटोप कशासाठी?'' कलीफा खो खो हसत म्हणाला. ''एक हजार मोहरांसाठी, महाराज!'' अबूलहसन हात पुढे करीत म्हणाला. कलीफाला हसू आवरत नव्हते. तो हसत हसत म्हणाला, ''अरे, तू जिवंत आहेस म्हणजे आमच्या करमणुकीला तोटा नाही. दिल्या तुला एक हजार मोहरा!'' कलीफाने एक हजार मोहरांची पिशवी त्याच्या हातावर ठेवली. जुबैदी राणीनंही नुझातूला जिवंत आहे या आनंदाप्रीत्यर्थ तिच्या हातावर एक हजार मोहरा ठेवल्या. दोघेही खूष झाले. पुढे अनेक वर्षे त्यांनी कलीफा आणि राणी जुबैदी यांच्या सेवेत घालविली.

म. ग्रं. सं. कार्य,
बाल वाङ्मय
क्र. ३१९५ ७/११/९६
विभाग बा. वा.

७

# 'हवेत उडणारा घोडा'

इराणच्या बादशहाला नवनिर्मितीची अतिशय आवड होती. माणसाने आपल्या बुद्धीचा वापर करून नवीन नवीन वस्तू तयार कराव्यात. मात्र त्या उपयुक्त असाव्यात असे त्याला वाटत असे. अशा वस्तू तयार करणाऱ्या कारागिरांना उत्तेजन देण्याकरिता तो दरवर्षी आपल्या राजधानीत नवीन वस्तूंचे संशोधन केलेल्या कारागिरांचे संमेलन भरवीत असे. कारागिरही आपण तयार केलेली वस्तू घेऊन त्याच्या दरबारात हजर राहात असत. बादशहा त्यांच्या संशोधनाची माहिती मिळवी आणि त्यांना उत्तेजन मिळावे म्हणून त्यांना मोठे बक्षीस देऊन सन्मानही करी.

एका वर्षाची गोष्ट. बादशहाने कारागिरांच्या संमेलनाची तारीख ठरवून त्याप्रमाणे सर्व देशात पत्रके पाठविली. संमेलनाची तयारी झाली. एका भव्य मंडपात देशोदेशीचे कारागीर आपल्या तयार केलेल्या वस्तूसह येऊन बसले. बादशहा आणि विविध विषयांतील तज्ज्ञ मंडळी एकेका कारागिराला मुद्दाम तयार करून घेतलेल्या मंडपात बोलावून त्याच्या संशोधनाची माहिती समजावून घेत होते. सर्वात शेवटी 'अब्दुल सुलेमान' या हिंदुस्थानजवळील एका देशातील कारागिराचा नंबर आला. आपण तयार केलेला धातूचा घोडा घेऊन तो बादशहापुढे गेला. बादशहासमोरील आसनावर बसून त्याने आपण बनविलेल्या घोड्याची माहिती सांगितली. तो म्हणाला, ''महाराज, माझा



हा घोडा अद्भुत आहे. हा मंतरलेलाच घोडा आहे म्हणा ना. या घोड्यावर बसून अगदी थोड्या काळात मी दूरवरची सफर आकाशमार्गे करू शकतो.'' बादशहाला आश्चर्य वाटले. तो म्हणाला,

''ठीक आहे, इथून पाच कोस अंतरावर अलबेला नावाचा पर्वत आहे. त्या पर्वतावर एकच झाड आहे. त्या झाडाची पाने नक्षीदार आणि बरीच रुंद असून त्यावर लाल रंगाचे ठिपके आहेत. त्यापैकी एक पान तू कमीत कमी वेळात घेऊन ये.''

''ठीक आहे.'' असे म्हणून अब्दुल सुलेमान मंडपाबाहेर जाऊन घोड्यावर बसला आणि त्याने घोड्याच्या मानेजवळील कळ दाबली. त्याबरोबर तो घोडा आकाशात उंच उडाला आणि बघता बघता नाहीसा झाला. थोड्या वेळातच घोडा आकाशातून खाली उतरला. अब्दुल सुलेमानच्या हातात त्या विचित्र झाडाचे पान होते. आपला घोडा आणि पान घेऊन तो बादशहापुढे हजर झाला. बादशहाने अब्दुल सुलेमानला शाबासकी दिली. त्याच्या संशोधनाची तारीफ केली आणि त्याला मोठे बक्षीसही जाहीर केले. परंतु तो घोडा आपल्याकडे असावा असे बादशहाला वाटू लागले. तो अब्दुल सुलेमानला म्हणाला, ''अब्दुल सुलेमान, तुझा घोडा विकत घेण्याची माझी इच्छा आहे. तुला पाहिजे तितकी किंमत सांग. तुला ती मिळेल.'' बादशहाचे शब्द ऐकून अब्दुल सुलेमान गालातल्या गालात हसला आणि धीर धरून म्हणाला, ''महाराज, मला दौलत नको. परंतु बादशहा आपल्या कन्येबरोबर माझं लग्न लावून मला जावई करून घेणार असतील तर हा घोडा मी बादशहाला देण्यास तयार

आहे.'' अब्दुल सुलेमानचे शब्द ऐकून बादशहाला राग आला होता. परंतु घोडा आपल्याकडे राहावा असे त्याला वाटत होते. तो विचारात पडला. इतक्यात त्याचा पुत्र बादशहा फिरोजशहा तिथं आला.

तो म्हणाला, ''महाराज, मी अगोदर घोड्यावर बसून त्याचे गुणदोष पारखून घेतो. नंतर तुम्ही पाहिजे तो निर्णय घ्या.'' लगेच तो घोडा घेऊन बाहेर गेला आणि त्याच्यावर बसून त्याने त्याच्या कानाजवळील कळ फिरविली देखील. क्षणार्धात घोडा वर उडाला. अब्दुल सुलेमान मोठमोठ्याने ओरडू लागला. ''महाराज, बादशहा फिरोजशहाने घोडा खाली उतरविण्याची कळ समजावून घेतलेली नाही. आता त्याचे काही बरेवाईट झाले तर त्याला मी जबाबदार नाही. बादशहा घाबरला. त्याने आकाशाकडे पाहिले. घोडा तर राजपुत्राला घेऊन केव्हाच दिसेनासा झाला होता. बादशहाने अब्दुल सुलेमानला कैद केले आणि राजपुत्र सुखरूप परत येईपर्यंत त्याला न सोडण्याचा हुकूम दिला. अब्दुल सुलेमानला बादशहाचा खूपच राग आला होता. परंतु काही इलाज नव्हता.

इकडे राजपुत्राला घेऊन घोडा वर वर जात होता. घोड्याला खाली उतरविण्याची कळ राजपुत्रानं समजावून न घेतल्यामुळे त्याला घोडा जमिनीकडे वळविता येत नव्हता. धीर धरून दुसरी कळ कुठे आहे याचा तो शोध घेऊ लागला! आणि अचानक त्याला घोड्याच्या उजव्या कानाच्या मागे दुसरी कळ सापडली. ती दाबताच घोडा हळूहळू खाली येऊ लागला. आपला घोडा कुठे उतरत आहे हे राजपुत्राला काहीच समजत नव्हते. मात्र सगळीकडे काळाकुट्ट अंधार दाटलेला होता. त्यामुळे वेळ रात्रीची

आहे हे त्याने ओळखले. अखेर घोड्याचे पाय जमिनीला लागून घोडा एक झटका देऊन थांबला. राजपुत्र घोड्यावरून उतरून आजुबाजूचे निरीक्षण करू लागला. आपण एका भव्य राजवाड्याच्या गच्चीवर उतरलो आहोत हे त्याच्या लक्षात आले. गच्चीवर छोटे दिवे मिणमिणत होते. तसेच वाड्याच्या भोवती असलेल्या बगिच्यातही दिवे दिसत होते. राजपुत्र खूपच दमला होता. त्याला सपाटून भूकही लागली होती. गच्चीतून खाली जाण्याचा मार्ग त्याने शोधून काढला. एका भव्य दगडी जिन्यावरून तो खाली उतरला. खाली एका दालनात दहा बारा शिपाई झोपले होते. जवळच तलवारी टांगलेल्या होत्या. पाय न वाजविता त्याने दुसऱ्या दालनात प्रवेश केला. या दालनात मिणमिणते दिवे होते. दारावरचे सुंदर नक्षीदार पडदे वाऱ्यावर हलत होते. एका उंची सुंदर पलंगावर राजकन्या शांत झोप घेत होती. तिच्या दास्या खाली जमिनीवरील गालिच्यावर झोपल्या होत्या. राजपुत्राने एक क्षण राजकन्येकडे पाहिले. ती अतिशय सुंदर होतीच परंतु दयाळूही असावी असे राजपुत्राला वाटले. तो चटकन गुडघे टेकून जमिनीवर बसला आणि नम्रतेने म्हणाला, ''हे राजकन्ये, मी इराणच्या बादशहाचा वडील पुत्र. वाट चुकल्यामुळे तुझ्या शयनगृहात हजर झालो आहे. चुकीबद्दल मी तुझी क्षमा मागतो. परंतु माझी सर्व हकिगत ऐकून घे आणि मला मदत कर. या क्षणी मी अतिशय भुकेला असून थकलो आहे.'' राजपुत्राचा आवाज ऐकून राजकन्या व तिच्या सर्व दास्या जाग्या झाल्या. राजकन्या प्रथम घाबरलीच, परंतु नंतर राजपुत्र खरोखरच काहीतरी संकटात सापडला असल्याची तिची खात्री झाली. तिने राजपुत्राला अभय दिले. आपल्या

मधुर आवाजात ती म्हणाली,

"हे युवराज, तू खरोखरच एखाद्या संकटात सापडला असल्याची माझी खात्री झाली आहे. शेजारच्या महालात मी तुझी व्यवस्था करते. तिथे स्नान करून यथेच्छ भोजन कर आणि विश्रांती घे. उद्या मी तुझ्या भेटीला येईन. त्यावेळी मला सर्व हकिगत सांग. तुला हवी असलेली मदत करायला मी तयार आहे." दास्यांनी राजपुत्राला सन्मानानं दुसऱ्या महालात नेलं. तिथं राजकन्येच्या नोकरांनी राजपुत्राची उत्तम बडदास्त ठेवली. राजपुत्राने स्नान करून भोजन केले आणि भरपूर विश्रांती घेतली. आता त्याच्या अंगात तरतरी येऊन प्रवासातली मरगळ नाहीशी झाली.

दुसऱ्या दिवशी राजकन्या राजपुत्राच्या भेटीला त्याच्या महालात आली. एका रत्नजडित मंचकावर बसून तिने राजपुत्राची सर्व हकिगत ऐकून घेतली. आपण इराणचे राजपुत्र असून इथवर कसे आलो हे सांगून झाल्यावर राजपुत्राने वाड्याच्या गच्चीवर उभा केलेला मंतरलेला घोडा राजकन्येला दाखविला. राजकन्येने तो बंदोबस्तात खाली आणून एका सुरक्षित ठिकाणी ठेवून घेतला. राजपुत्राने आणखी काही दिवस तिच्या वाड्यावर राहून विश्रांती घ्यावी असे तिने सुचविले. राजपुत्रानेही तिची विनंती आनंदाने मान्य केली.

आता त्यांच्या रोज गाठीभेटी होऊ लागल्या. रोजच्या गप्पागोष्टींतून एकमेकांचे स्वभाव एकमेकांना समजले. दोघांनाही एकमेकांना भेटल्याशिवाय चैन पडेना. एक दिवस राजपुत्राने आपल्या मनातील हेतू राजकन्येला सांगून तिच्याशी लग्न करण्याची इच्छा प्रगट केली. राजकन्येलाही राजपुत्र आवडला

होता, परंतु तिच्यापुढे एक फार मोठी अडचण होती. ती म्हणाली,
"युवराज, माझे वडील बंगाल प्रांताचे सुलतान आहेत. तसे ते अतिशय प्रेमळ आणि दयाळू आहेत. माझ्यावर त्यांचे प्रेम आहे. परंतु परदेशातील युवराजाशी ते माझं लग्न लावून देणार नाहीत. या बाबतीत ते कुणाचंही ऐकणार नाहीत. सहा महिन्यांपूर्वी हवा बदलण्यासाठी त्यांनी मला या वाड्यात आणून ठेवलं आहे. आणखी सहा महिन्यांनी आम्ही त्यांच्या वाड्यात जाऊ." राजकन्येचे शब्द ऐकून राजपुत्राला खूपच वाईट वाटले. यावर काहीतरी उपाय शोधून काढण्याचा दोघेही विचार करीत होते. अखेर राजपुत्राने दोघांनीही मंतरलेल्या घोड्यावरून पळून जाण्याची कल्पना राजकन्येला सांगितली. राजकन्येनेही त्यावर विचार केला. अखेर मंतरलेल्या घोड्यावरून दोघांनीही पळून इराणला जायचे आणि लग्न केल्यानंतर राजकन्येच्या वडिलांना बंगाल प्रांताच्या सुलतानाला संदेश पाठवावयाचा असे ठरले.

दोघांनीही पळून जाण्याची तयारी केली. नोकराचाकरांपासून गुप्तता राखली. एक दिवस घोडा साफ करण्याच्या निमित्ताने राजपुत्राने तो वाड्याच्या गच्चीवर आणविला. राजकन्याही घोड्याची करामत पाहण्यासाठी गच्चीवर आली. सोबत दासदास्या व इतर नोकरचाकरही होते. राजकन्येने भरजरी वस्त्रे परिधान केली होती. विविध उंची अलंकारांनी ती नटली होती. "घोड्यावर बसून तो कसा चालतो ते मला बघायचे आहे." असं म्हणून ती घोड्यावर बसली. "मी तुला दाखवतो घोडा कसा चालतो ते!" असं म्हणून राजपुत्रही तिच्या मागे बसला. नोकरचाकर भीतीने पुढे सरसावणार तोच राजपुत्राने घोड्याच्या मानेजवळची कळ दाबली आणि बघता बघता घोडा उंच उडाला.

नोकरचाकर हातात तलवारी घेऊन आ वासून वर पाहात राहिले आणि काही क्षणातच घोडा दिसेनासा झाला. घोडा परत खाली उतरेल म्हणून सर्वांनी वाट पाहिली, परंतु व्यर्थ. अखेर राजकन्या पळून गेल्याची हकिगत त्यांनी सुलतानाला कळविली.

इकडे राजपुत्राने आपला घोडा इराणकडे वळविला. मात्र तो राजधानीत न उतरविता राजधानीबाहेरील आपल्या जुन्या वाड्यावर उतरविला. तेथील नोकरांकडून राजकन्येची नीट व्यवस्था करून तो बादशहाला भेटण्यासाठी दुसऱ्या घोड्यावरून त्याच्या महालात आला. राजपुत्र परत आलेला पाहून राजवाड्यावर आनंदीआनंद झाला. पितापुत्रांची भेट झाली. राजपुत्राने बंगालची राजकन्या आपल्या सोबत आली असून आपल्याला तिच्याशी लग्न करण्याची इच्छा असल्याचे राजपुत्राने आपल्या पित्याला सांगितले. राजकन्येच्या उत्तम स्वभावाची माहिती ऐकून बादशहाने त्यांच्या लग्नाला लगेच परवानगी दिली आणि राजकन्येला सन्मानानं राजवाड्यात आणण्याची तयारी केली. राजानं ताबडतोब अब्दुल सुलेमानला कैदेतून सोडण्याचा आदेश दिला. अब्दुल सुलेमानच्या कानावर राजपुत्र परत आला असून त्याने सोबत एक सुंदर राजकन्याही आणली असल्याची बातमी अगोदरच पोहोचली होती. कैदेतून बाहेर पडताच क्षणाचाही विलंब न लावता त्याने त्या जुन्या वाड्याचा शोध घेतला. आपल्या जवळील पैशातून उंची पोशाख खरेदी करून तो एका घोड्यावर बसून त्या जुन्या वाड्यात गेला. बादशहाने राजकन्येला त्या मंतरलेल्या घोड्यावरूनच राजवाड्यात आणण्यासाठी आपल्याला पाठविले असल्याचे त्याने तेथील कारभाऱ्याला सांगितले. सर्वांना त्याचे म्हणणे खरे वाटले.

राजकन्या साजशृंगार करून तयार होतीच. अब्दुल सुलेमाननं तिला चटकन घोड्यावर बसविली आणि आपण मागे बसून घोड्याच्या मानेवरची कळ दाबली. क्षणार्धात घोडा वर उडाला. थोड्याच वेळात राजकन्येला नेण्यासाठी राजवाड्यातील प्रतिष्ठीत मंडळी हजर झाली आणि खरा प्रकार सर्वांच्याच लक्षात येऊन धावपळीला सुरुवात झाली. पण व्यर्थ. राजकन्येचा थोडाच पत्ता लागणार होता. राजकन्येच्या वियोगाने राजपुत्र दु:खी झाला. त्याहीपेक्षा निष्पाप राजकन्या नोकरवर्गाच्या निष्काळजीपणामुळे दुष्टाच्या हाती लागली या गोष्टीचे त्याला अतोनात दु:ख झाले. बादशहा देखील विचारात पडला. असेच दोन दिवस निघून गेले. असेच दु:खाने हातपाय गाळून बसून राहाण्यापेक्षा राजकन्येचा शोध घ्यावा असे त्याच्या मनात आले. लगेच तो तयारीला लागला. अब्दुल सुलेमान हिंदुस्थानच्या जवळील कुठल्यातरी प्रांतात राहाणारा होता. म्हणजे तो तिथंच कुठंतरी गेला असणार म्हणून त्या विभागात वेष पालटून जाण्याचे त्याने ठरविले आणि लवकरच तो त्या मोहिमेवर निघाला देखील.

इकडे अब्दुल सुलेमानने आपला घोडा निसर्ग सौंदर्याने नटलेल्या काश्मीरमधील जंगलात उतरविला. आपल्या घोड्यामध्ये झालेल्या बिघाडामुळे आपण राजवाड्यात न उतरता दुसरीकडे आलो असे त्याने राजकन्येला सांगून आपण घोडा दुरुस्त करून तुला तुझ्या मुक्कामाकडे पोचविणार आहोत असे खोटेच आश्वासन दिले. राजकन्येला त्याचे म्हणणे खरे वाटले. त्याने कुठूनतरी गोळा करून आणलेल्या फळांवर तिने आपली भूक भागविली. परंतु बराच वेळ झाला तरी अब्दुल सुलेमान घोडा दुरुस्त करीना. उलट आजुबाजूला कोणी नाही असे पाहून

तो म्हणाला, "राजकन्ये हा अद्‌भुत घोडा मी तयार केलेला आहे. इराणच्या राजपुत्राने माझा घोडा पळविला आणि बादशहाने मला शिक्षा केली. तुला पळवून आणून मी त्यांच्यावर सूड उगविला आहे. तेव्हा आता माझ्याशीच तुला लग्न करायला हवे. आपण लग्न करून काही काळ या निसर्गरम्य परिसरात राहू आणि नंतर देशोदेशीच्या सफरी करून माझ्या देशात जाऊ."

अब्दुल सुलेमानचे बोलणे ऐकून राजकन्या घाबरली. परंतु मोठ्यामोठ्यानं ओरडून कुणी मदतीला आल्यास प्रयत्न करावा म्हणून ती ओरडू लागली, "धावा, धावा. वाचवा, वाचवा." योगायोगानं त्याच जंगलात त्या विभागाचा बादशहा शिकारीला आला होता. राजकन्येचा आवाज ऐकून आपल्या लोकांसह तो धावत तिथं आला. राजकन्येला धीर आला. त्याला अभिवादन करून ती म्हणाली, "महाराज, मी बंगालच्या सुलतानाची कन्या असून इराणच्या राजपुत्राशी माझं लग्न होणार होतं, परंतु हा मुशाफिर मला कपटानं इथं घेऊन आला असून माझ्याशी जबरदस्तीने लग्न लावण्याचा प्रयत्न करतोय. कृपा करून मला याच्या तावडीतून सोडवा आणि इराणला पोचवा." बादशहाने मुशाफिराकडे चौकशी केली असता ही आपली बायकोच आहे असे तो म्हणू लागला. परंतु त्याचे बोलणे आणि एकंदर अवतार पाहून बादशहाला राजकन्येचे म्हणणे पटले. आपल्या तलवारीचा वार करून त्याने त्या मुशाफिराला ठार केले आणि राजकन्या व तो अद्‌भुत घोडा घेऊन तो आपल्या राजधानीत परतला. राजकन्येला एका सुंदर महालात ठेवून त्यानी तिची सर्व सोय केली. बादशहा स्वत: महालात येऊन तिची विचारपूस करी. परंतु तिला इराणला

पाठविण्याविषयी काहीच बोलेना. असेच काही दिवस निघून गेले आणि एक दिवस बादशहाने आपण स्वत:च उद्याच्या मुहूर्तावर तुझ्याशी लग्न करणार आहोत असे सांगून टाकले. राजकन्येला अतिशय वाईट वाटले. केवळ आपल्या सौंदर्यासाठीच प्रत्येकजण आपल्याला सुखात ठेवण्याचा प्रयत्न करून आपल्याशी लग्न करण्याची भाषा करतोय. परंतु राजपुत्राचे आपल्यावर खरे प्रेम होते. कदाचित आपल्या शोधासाठी तो निघालाही असेल. तेव्हा असेच काही दिवस युक्तीने काढणे आवश्यक आहे. तिला शांत बसलेली पाहून बादशहा गोडगोड बोलून तिचे मन वळवू लागला. परंतु ती एकाएकी मोठमोठ्याने ओरडू लागली. वेडे चाळे करू लागली. बादशहाच्या अंगावर मारायला धावू लागली. आजुबाजूची नोकरमंडळी धावत पुढे आली. ''राजकन्येला वेडाचा झटका आलेला दिसतोय.'' कुणीतरी म्हणाले. आता राजकन्येने आपले वेडाचे चाळे आणखी वाढविले. ''माझ्या शरीरात कुणीतरी शिरले आहे. त्याला काढून टाका. मग मी तुमच्याशी लग्न करीन.'' ती मोठमोठ्याने ओरडू लागली. अप्रतिम सौंदर्य लाभलेल्या फुलासारख्या नाजूक आणि मधुर भाषिणी राजकन्येला एकाएकी झाले तरी काय! बादशहा विचार करीत होता. त्यानी आपल्या राजवाड्यावरच्या हकिमांना बोलावून राजकन्येच्या आजारावर औषधोपचार करण्यास सांगितले. हकीम औषधे देत होते. राजकन्या घेत होती. परंतु गुण पडत नव्हता. शेवटी राजाने देशाबाहेरील हकिमांना राजकन्येची प्रकृती तपासण्यासाठी बोलावण्यास सुरुवात केली. हकिमांबरोबर साधू फकीरही राजकन्येचे वेड घालविण्याचा प्रयत्न करू लागले. औषधोपचारात बरेच दिवस लोटले. परंतु

राजकन्येच्या शरीरात शिरलेली अद्‌भुत शक्ती बाहेर पडत नव्हती.

एक दिवस बादशहाच्या अधिकाऱ्याबरोबर एक फकीर राजकन्येच्या महालात आला. त्याने राजकन्येची नाडी पाहिली, चेहरा न्याहाळला आणि आपल्या उपचाराने राजकन्या नक्की बरी होईल, मात्र त्याकरिता आपल्याला राणीच्या महालाजवळपासच राहावे लागेल, असे अधिकाऱ्याला सांगितले. बादशहाने परवानगी देताच त्याने औषधोपचाराला सुरुवात केली. मंत्र पुटपुटत असतानाच इतर लोकांचे लक्ष नाही असे पाहून फकिराने आपल्या बोटातील अंगठी राजकन्येपुढे केली. राजकन्येने ती न्याहाळून पाहिली. तिला खूण पटली. फकिराच्या वेषात इराणचा राजपुत्रच तिच्या समोर बसला होता. तिचे डोळे चमकले. एक दिवस आपल्यां प्रयोगातील धूपधूपाऱ्याच्या धुराने इतरांच्या डोळ्यांची आग होईल असे सांगून त्याने राजाच्या सर्व नोकरवर्गाला बाजूला केले आणि आपली योजना राजकन्येला सांगितली. राजकन्येने फकिराच्या औषधाने आपल्यात थोडा थोडा फरक पडतोय असे दाखवायचे आणि राजपुत्राच्या सूचनांकडे नीट लक्ष द्यायचे असे ठरले.

बादशहा मधून मधून महालात येऊन राजकन्येची चौकशी करीत असे. त्यालाही फकिराचे औषध राजकन्येच्या आजाराला लागू पडत असल्याचे दिसत होते. एक दिवस संधी साधून फकीर म्हणाला, "महाराज, मी ख़ूपच शक्तिशाली प्रयत्न करतो आहे. परंतु राजकन्येच्या शरीरातली ती अद्‌भुत शक्ती संपूर्ण नाहीशी होत नाही. त्याकरिता या राजकन्येविषयी आपण मला खरी हकिगत सांगायला हवी. म्हणजे ही अद्‌भुत शक्ती कुठून आली ते माझ्या लक्षात येईल आणि तसा प्रयत्न करता येईल."

फकीरधारी राजपुत्राची युक्ती सफल झाली. बादशहाने फकिराला सर्व हकिगत सांगितली. ती ऐकून फकीर म्हणाला, "म्हणजे त्या अद्भुत घोड्यातल्या शक्तीनेच राजकन्येच्या शरीरात प्रवेश केला आहे. त्या घोड्यासमोरच राजकन्येवर प्रयोग करायला हवा. आमावस्या दोन दिवसावर आली आहे. त्या दिवशीच रात्री या महालाच्या समोरील मोकळ्या जागेत प्रयोग करू. आपण स्वत: तो घोडा घेऊन या." बादशहाने फकिराचे म्हणणे मान्य केले. फकिराने राजकन्येला सावधपणे तयारीत राहायला सांगितले. आमावस्येचा दिवस उजाडला. सकाळपासूनच फकीर प्रयोगाच्या तयारीत गुंतला होता. मोकळ्या जागी एक लांबट गोल आखून त्यावर त्याने मोठमोठी विस्तव पात्रे रांगेने मांडली आणि उद-धुपाची तयारी केली. संध्याकाळी बादशहा व त्याचे अधिकारी घोडा घेऊन आले. तो त्या गोलाच्या मध्यभागी उभा करण्यात आला. गोलाभोवती थोड्या अंतरावर राजा व त्याचे अधिकारी बसले. विस्तवपात्रात जळते निखारे भरले गेले. फकिराने राजकन्येच्या दंडाला धरून तिला फरफटत खाली आणले. राजकन्या त्या गोलात शिरायला तयार नव्हती. ती मोठमोठ्यानं ओरडत होती. शेवटी फकिरानं तिला घोड्याजवळ लोटले आणि मोठमोठ्यानं मंत्र पुटपुटत सर्व विस्तवपात्रात उद-धूप घातला. त्याबरोबर डोळे चुरचुरणारे औषधही घातले. थोड्याच वेळात ती मोकळी जागा धुरानं भरून गेली. चटकन् राजकन्या घोड्यावर बसली. तोंडानं मोठमोठ्यानं मंत्र म्हणत फकीरधारी राजपुत्र मागे बसला आणि त्यानी घोड्याच्या मानेजवळची कळ दाबली. क्षणार्धात घोडा आकाशात उंच उडाला. गोलाभेवती जमलेली मंडळी डोळे चोळत होती. काहींना

तर खोकल्याचीही उबळ आली. सगळीकडे धूर दाटल्यामुळे समोरचे काहीच दिसत नव्हते. परंतु एकाएकी फकिराचे मंत्र व राजकन्येचे ओरडणेही ऐकू येईनासे झाले. बादशहा आणि त्याचे अधिकारी गोलात काय घडले ते पाहू लागले. नोकर पुढे सरसावले. पाहातात तो आत घोडा नाही, फकीर नाही आणि राजकन्याही नाही. बादशहा आणि त्याचे अधिकारी खाली मान घालून आपल्या वाड्याकडे परतले.

इकडे राजपुत्राने आपला घोडा राजकन्येसह इराणच्या बादशहाच्या वाड्यावरच उतरविला. बादशहाला खूपच आनंद झाला. राजपुत्र आणि राजकन्या दोघेही खूपच दमले होते. सर्व मंडळी त्यांच्या सेवेला धावली. थोड्याच दिवसात राजपुत्राचे राजकन्येशी थाटामाटात लग्न लागले. बादशहाने बंगालच्या सुलतानालाही आपली राजकन्या आमची सूनबाई झाल्याचे कळविले. मात्र पुढे कुणीही त्या घोड्याचा उपयोग वाईट कामासाठी करू नये म्हणून बादशहाने त्या घोड्याचे सर्व सांधे मोकळे करून त्याला नामशेषच करून टाकले.

BVBK-0403195

३१९५ ७/११/९६
बा.बा